रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक १०५ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. २२ सप्टेंबर २०२५
किंमत ४ ₹







# नवदुर्गेच्या जागराला प्रारंभ

## पाच हजार ठिकाणी घटस्थापना

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

गणेशोत्सवानंतर जिल्ह्यात नवरात्रौत्सवाचा जल्लोष नऊ दिवस पाहावयास मिळणार आहे. पाच हजार १०६ ठिकाणी विधीवत पूजा करून घटस्थापना केली जाणार आहे. त्यामध्ये एक हजार ३८७ दुर्गा मूर्ती आणि १९२ प्रतिमांचा समावेश आहे. नवरात्रौत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. नऊ दिवस धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम ठिकठिकाणी साजरे होणार आहेत.

गणरायाच्या निरोपानंतर जिल्ह्यामध्ये नवरात्रौत्सवाचे वेध लागले होते. घरोघरी सजावट करण्याची लगबग सुरु झाली होती. महिलांसाठी नवरात्रौत्सव महत्वाचा मानला जातो. देवीच्या स्वागतासह पुजेसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी रविवारी बाजारात गर्दी झाली होती. दिवसभर पावसाची रिपरिप सुरु असतानादेखील भक्तांनी त्यावर मात करीत मोठ्या उत्साहाने देवीच्या स्वागतासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यावर भर दिला. सोमवार (दि.२२) पासून जिल्ह्यात नवरात्रौत्सव साजरा केला जाणार आहे. सकाळी विधीवत पूजा करून घट स्थापन केले जाणार आहे. एकूण पाच हजार १०६ ठिकाणी घट स्थापन केले जाणार आहेत. त्यात सार्वजनिक एक हजार ६१७ व तीन हजार ४८९ ठिकाणी खासगी घट स्थापन केले जाणार आहेत. यंदाही घट स्थापनेसह काही मंडळाच्या वतीने देवीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. एकूण एक हजार ३८७ मूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे. शहरातील जागृत देवस्थान असलेल्या काळंबादेवीच्या दर्शनासाठी अफाट गर्दी होणार आहे. या ठिकाणी खाद्य पदार्थांसह खेळणी पुजेचे साहित्यांची दुकाने सजली जाणार आहे. त्यामुळे नऊ दिवस याठिकाणी

पान २ वर

### महिलांच्या सुरक्षेवर भर

नवरात्रौत्सवाच्या निमित्ताने दांडिया, गरबा सारखे नृत्यांचे सादरीकरण केले जाणार आहे. वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रम होणार आहे. या कालावधीत महिलांची गर्दी होणार आहे. हा उत्सव आनंदात साजरा करता यावा, यासाठी पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात कडेकोट पहारा ठेवला जाणार आहे. पोलीस दलासह होमगार्डच्या मदतीने बंदोबस्त ठेवला जाणार आहे. साध्या गणवेशात पोलीस तैनात राहणार असून महिलांच्या सुरक्षेवर भर दिला जाणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून देण्यात आली आहे.



# भारत-पाक सीमेवर तणाव

। काश्मीर । वृत्तसंस्था ।

पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी २२ एप्रिल रोजी काश्मीरच्या पहलगाममध्ये मोठा हल्ला केला होता. दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर भारतीय वायूदलाने पाकव्याप्त काश्मीर व पाकिस्तानमध्ये घुसून दहशतवाद्यांचे अनेक तळ उद्ध्वस्त केले. भारताने यासाठी ऑपरेशन सिंदूर ही मोहीम राबवली होती. मात्र, त्यानंतर दोन्ही देशांनी सामंजस्याने युद्धविरामाचा निर्णय घेतला. मात्र, प्रत्यक्ष युद्ध थांबलं असलं तरी पाकिस्तानी लष्कराच्या सीमेवरील कुरापती थांबलेल्या नाहीत. एका बाजूला पाकिस्तानी सरकार जगभरात भारताच्या नावाने गळा काढत आहे, तर दुसऱ्या बाजूला पाकिस्तानी लष्कर मात्र काड्या करत आहे.

पान २ वर

# तळोजात तरूणीची हत्या

। पनवेल । वार्ताहर ।

तळोजा फेज-२ मधील आसावरी हौसिंग सोसायटीमध्ये आईसह राहणाऱ्या तमन्ना मोफीजुल शेख या १७ वर्षीय मुलीची निघृणपणे हत्या करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे तमन्ना हिची हत्या तिच्या मावशीच्या पतीनेच केल्याचे उघडकीस आले आहे. त्यानुसार तळोजा पोलिसांनी तपास करुन आरोपीला अटक केली आहे.

या प्रकरणात अटक केलेल्या आरोपीचे नाव मोहम्मद अयुब शाहीद मिस्त्री (वय-४४) असे असून, तो मुळचा पश्चिम बंगालमधील आहे. सध्या तो उल्हासनगर कॅम्प-५ मध्ये राहत असून, तो जीन्स तयार करणाऱ्या कारखान्यात काम करत होता. विशेष म्हणजे तो मृत तमन्ना शेख हिच्या आईच्या बहिणीचा पती आहे. या दोन्ही कुटुंबांमध्ये काही दिवसांपासून आर्थिक वाद सुरु होते. तमन्ना हिचे आपल्या मुलासोबत लग्न व्हावे, अशी आरोपी मोहम्मद अयुब याची इच्छा होती. मात्र, तमन्ना हिला दुसरीकडून लग्नासाठी स्थळ येत असल्यामुळे ती आपल्या मुलासोबत लग्न करण्यास नकार देईल, अशी त्याला शंका होती. या कारणावरुन मोहम्मद अयुब याने तमन्ना हिला समजावण्यासाठी तळोजा येथील तिच्या घरी गेला होता. तमन्ना हिची आई सकाळी कामावर गेल्याने तमन्ना घरामध्ये एकटीच होती. यावेळी तमन्नासोबत वाद झाल्यानंतर मोहम्मद आयुब याने संतापाच्या भरात प्रथम कुकरने तिच्या डोक्यावर हल्ला केला. त्यानंतर धारदार सुरीने भोसकून तिची हत्या केल्यानंतर त्याने पलायन केले. सायंकाळी तमन्नाची आई

पान २ वर

# वसंत चौलकर यांचे निधन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार वसंत भाऊ चौलकर (७४)यांचे रविवारी निधन झाले. त्यांच्या निधनाने चौलकर कुटुंबियात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, मुली, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे. वसंत भाऊ चौलकर हे राजकीय, सामाजिक, पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय होते. गेली अनेक वर्ष त्यांनी कृषीवलमध्ये पुरवणी संपादक म्हणून काम पाहिले. वेगवेगळ्या विषयांवर त्यांचे चांगले लिखाण होते. अलिबाग नगरपरिषदेचे नगरसेवक ते माजी उपनगराध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले होते. सामाजिक क्षेत्रातदेखील त्यांचे मोलाचे योगदान होते. रविवारी सकाळी त्यांचे



पान २ वर



# माथेरानमध्ये घोड्यांना लंपी सदृश्य आजार

**अश्वमालक संकटात; जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पशुवैद्यकीय डॉक्टर पाठवणार का?**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या पर्यटनस्थळी ब्रिटिश काळापासून वाहतुकीचे साधन म्हणून घोड्यांचा वापर केला जातो. सध्या तेथे असलेल्या काही घोड्यांना डोळ्यातील आजार दिसून येत आहेत. मात्र माथेरानमध्ये जिल्हा परिषदेचा पशुवैद्यकीय अधिकारी गेले काही महिने गायब आहे. त्यामुळे माथेरान शहरातील असंख्य अश्वपालक हे आपल्या घोड्यांना गमावण्याची शक्यता निर्माण झाली असून लाखोंचे नुकसान त्या आजारामुळे होण्याची शक्यता आहे.

माथेरान शहरात घोडे हे वाहतुकीचे साधन आहे. त्या ठिकाणी प्रदूषण करणाऱ्या वाहनांना बंदी असल्याने शहरात स्थानिक आणि पर्यटकांच्या वापरासाठी ४६० घोडे यांना जिल्हा प्रशासनाने परवानगी दिली आहे. तेथे सामान वाहतूक करण्यासाठीदेखील घोड्यांचा वापर केला जात असून त्यासाठी ३३० घोड्यांना परवानगी आहे. या सर्व घोड्यांच्या देखरेखीसाठी रायगड जिल्हा परिषद यांच्या पशुवैद्यकीय विभागाकडून पशुधन दवाखाना सुरु केला आहे. मात्र त्या दवाखान्यात पशु वैद्यकीय डॉक्टर नसल्याने



माथेरानमधील घोड्यांची आणि अन्य पशुधन यांच्या आरोग्याची मोठी चिंता निर्माण झाली आहे. माथेरानमधील घोड्यांना मागील वर्षी खुडतुड्या रोगाचा प्रादुर्भाव त्यांच्या पायांना झाला होता. अशा अनेक प्रकारच्या आजारामुळे माथेरानमधील अश्वपालक चिंतेत आहेत.

गेली दोन वर्षे जनावरांना लंपी आजाराने त्रस्त केले आहे. माथेरानमधील घोड्यांना मागील काही दिवसांपासून लंपीसदृश आजाराने ग्रासले आहे. येथील १२ ते १५ घोड्यांच्या डोळ्यांना नवीन आजार आढळून येत आहे. या आजारात घोड्यांच्या डोळ्याला सुरुवातीला सूज येते. त्यातील एक डोळा राखाडी रंगाचा होतो आणि नंतर तोच डोळा पिवळा होतो. त्यानंतर दुसरा डोळा राखाडी रंगाचा होतो आणि पिवळा झालेला डोळा हा लाल होतो. त्यानंतर घोड्याला अंशतः अंधुक दिसायला लागते आणि त्यामुळे घोड्यांना कायमचे अंधत्व येण्याची भीती निर्माण होते. या आजारावर उपचार केले गेले नाहीत तर मात्र आठ दहा दिवसात घोड्यांना डोळ्यांनी दिसणे बंद होऊ शकते.

याबाबत माथेरानमधील घोड्यांची तपासणी पुणे येथील अश्वसेवा संस्थेच्या माध्यमातून करण्यात आली होती. त्यावेळी घोड्यांना हा आजार असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते.

> “माथेरान पशुवैद्यकीय दवाखाना सर्वच अश्वपालकांचा मुख्य आधार होता. मात्र त्या दवाखान्यात असलेले डॉक्टर आम्हाला अनेक महिने दिसले नाहीत आणि त्यामुळे घोड्यांच्या नवीन आजारावर उपचार कुठे करायचे? असा प्रश्न निर्माण झाला आहे. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना गरिबांची जाण असल्याचे आम्ही ऐकले आहे. त्यामुळे त्यांनी माथेरानमधील पशुवैद्यकीय दवाखान्याची दखल घ्यावी, अशी आमची मागणी आहे. घोड्यांवर उपचार झाले नाहीत तर घोड्यांना अंधत्व येऊन आमचे लाखोंचे नुकसान होऊ शकते.
> – राकेश कोकले, अश्वपालक”

# राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील काही भागात मागील दोन-तीन दिवसांपासून ढगाळ वातावरण असून काही भागात हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडला. काही भागात रविवारी पावसाच्या सरी बरसल्या. दरम्यान, पुढील चार ते पाच दिवस राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

हवामान विभागाने पुढील पाच दिवसांसाठी सर्वच जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. यावेळी काही भागात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज असून काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. दरम्यान, उत्तर अंदमान समुद्रात म्यानमारच्या किनाऱ्यालगत सोमवारपर्यंत चक्राकार वाऱ्यांची स्थिती तयार होण्याची शक्यता आहे. या वाऱ्यांच्या प्रभावामुळे २५ सप्टेंबरपर्यंत हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. या चक्राकार वाऱ्यांपासून दक्षिण मध्य महाराष्ट्रापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा विस्तारला आहे.

**मेघगर्जनेसह पाऊस**

**रायगड, रत्नागिरी, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव.**

**हलक्या ते मध्यम सरी**

**मुंबई, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, जळगाव, कोल्हापूर, सातारा, सांगली**

दक्षिण उत्तर प्रदेशापासून मराठवाड्यापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा कायम आहे.

राज्यात सर्वत्र रविवारपासून पावसाची शक्यता



आहे. काही भागात मुसळधार तर काही भागात हलक्या ते मध्यम सरी बरसतील. मुंबईतही हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा अंदाज आहे. दरम्यान, मुंबईत मागील काही दिवस पावसाने ओढ दिल्यामुळे उकाडा सहन करावा लागत आहे. तापमानातही काहीशी वाढ झाली आहे. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात शनिवारी ३०.२ अंश सेल्सिअस, तर सांताक्रूझ येथे ३१.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सांताक्रूझ येथील तापमान १ अंशाने अधिक नोंदले गेले.

## मुलींची मध्यस्थी करणाऱ्यावर हल्ला

**। पनवेल । वार्ताहर ।**

कामोठे परिसरात दोन मुलींच्या वादात मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या तरुणावर चाकू हल्ला झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या हल्ल्यात १९ वर्षीय तरुण जखमी झाला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हर्ष भगत (वय १९, उसर्ली खुर्द) असे जखमी तरुणाचे नाव आहे. हर्ष हा नोकरी निमित्त कामोठेत त्याचा मामाकडे राहत होता, त्याचे वडील कामोठे शहरात रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. १९ सप्टेंबर रोजी हर्ष कामावर गेला, त्याचा मित्राच्या सांगण्यानुसार हर्ष पुन्हा कामोठ्यातील त्याचा मित्र साहिल पाटील सोबत सेक्टर-३६, कामोठे येथील ज्यूडिओ शॉपजवळ गेला. साहिलला त्याचा परिचयातील दोन मुलींच्या भांडणात मध्यस्थी करण्यासाठी बोलावण्यात आले होते. घटनास्थळी पोहोचल्यावर या दोघी बोलत असताना त्यांच्यासोबत आलेल्या काही मुलांचा साहिलसोबत वाद सुरू झाला. तेव्हा हर्षने मध्यस्थी करत शांत राहण्यास सांगितले. मात्र त्याच्यावरच शिवीगाळ व हातघाईला सुरुवात झाली. त्यातून झटापट वाढली आणि त्यातील स्वराज नावाच्या मुलाने चाकू काढून हर्षच्या पाठीवर वार केला. हल्ल्यानंतर एका मुलीने स्वराज जाऊ दे, चल असे म्हणून तेथून आरोपींना घेऊन पसार झाली. जखमी अवस्थेत हर्षला त्याचा मित्र साहिलने जवळच्या हॉस्पिटलमध्ये दाखल केले. या प्रकरणी हर्ष भगत याने दिलेल्या फिर्यादीवरून कामोठे पोलीस ठाण्यात स्वराज व त्याच्या साथीदारांविरोधात मारहाण व जीवघेणा हल्ल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोलादपूर येथे स्वच्छतेवरील मेकअप स्पर्धा

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

जन सामान्यांमध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्य विषयक जन जागृती, कौशल्य विकास उपक्रम आदींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून पोलादपूर येथे स्वच्छतेवर आधारित मेकअप स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आणि सार्वजनिक स्वच्छता जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना कार्यक्रमाप्रसंगी समन्वयक ममता पाटील यांच्या माध्यमातून स्वच्छतेची शपथही देण्यात आली.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्षा रत्नप्रभा



बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यात जनशिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या १५ दिवसांच्या कालावधीत विविध स्वच्छतेवर आधारित जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती डॉ. विजय कोकणे यांनी दिली.

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील २० वर्षापासून सक्रियपणे सुरु आहे व आतापर्यंत ७० हजारांपेक्षा जास्त लाभार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले आहे. याच स्वच्छता, आरोग्य व जनजागृती उपक्रमाचा एक भाग म्हणून पोलादपूर येथे स्वच्छतेवर आधारित मेकअप स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सार्वजनिक स्वच्छता जनजागृती उपक्रमाप्रसंगी समन्वयक ममता पाटील, प्रशिक्षिका अस्मिता उमेश पवार व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## आदी कर्मयोगी अभियानांतर्गत शेणे येथे मेळावा संपन्न

**रायगड :** आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावून त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्यासाठी केंद्र सरकारने धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन हा राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम सुरू केला आहे.

रायगड जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधील ११३ गावांमध्ये हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविला जाणार आहे. यामुळे जिल्ह्यात आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन कार्यक्रमाला सुरुवात झाली असून पेण तालुक्यातील शेणे आदिवासी वाडी येथे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

# रेवदंड्यात डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे भव्य स्वच्छता अभियान



**। रेवदंडा। प्रतिनिधी ।**

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या माध्यमातून डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली रेवदंडा गावात व्यापक स्वच्छता अभियान हाती घेण्यात आले.

पावसाचा जोरदार मारा, सतत भिजत काम करण्याची वेळ असूनसुद्धा, ११०० हून अधिक श्री सदस्यांनी एकत्रितपणे स्वच्छतेचा व्रत घेत रेवदंडा चकचकीत केलं. भर पावसातही ११०० श्री सदस्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. २१.४ टन कचऱ्याची विल्हेवाट या अभियानाअंतर्गत लावण्यात आली. जुनी पोस्ट गल्ली, वाडी मोहल्ला, मोठा कोळीवाडा, मधला कोळीवाडा, भन्साळी आळी, आगर आळी, पागार मोहल्ला, श्री खंडोबा मंदिर, उर्दू शाळा, अंतर्गत मुख्य रस्ता तसेच ग्रामपंचायत हद्दीतील दुतर्फा रस्ते पूर्णपणे स्वच्छ करण्यात आले. एवढंच नाही तर रेवदंडा स्मशानभूमी तसेच समुद्रकिनाऱ्याचीही काटेकोरपणे स्वच्छता करण्यात आली.

अभियानादरम्यान जमा झालेला तब्बल २१.४ टन कचरा नियमानुसार थेट रेवदंडा बायपास डम्पिंग ग्राउंडमध्ये वर्गीकृत करून टाकण्यात आला. परिणामी रेवदंडा गाव आणि परिसर नव्या उमेदीने झळाळून निघाला. हिरवीगार झाडं, स्वच्छ रस्ते, शुद्ध हवा आणि कचरामुक्त किनारा यामुळे संपूर्ण गावाने जणू निसर्गरम्य हिरवीगार शालच पांघरल्याचा आनंद लोकांनी अनुभवला.

विशेष म्हणजे या अभियानाने फक्त कचरा साफ केला नाही तर गावागावांत एक जबरदस्त जनजागृती निर्माण केली. आपला परिसर आपणच स्वच्छ ठेवला, तर आपलं राज्य आणि देश आपोआपच सुंदर बनेल हा सकारात्मक संदेश प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचला.

रेवदंड्यातील नागरिक, महिला, तरुणाई यांच्यात एकच जोरदार चर्चा रंगली. आज गाव खरंच ओळखूच येत नाही; इतकं सुंदर, स्वच्छ, हिरवं आणि आनंदी वातावरण तयार झालं आहे.संपूर्ण जनतेने श्री सदस्यांच्या कार्याला मनापासून दाद देत भरभरून आभार मानले.

# कुर्ला गायकरवाडी येथे कारला अपघात

**■ सुदैवाने जीवित हानी टळली**

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड-दापोली राज्य रार्गावर कुर्ला गायकरवाडी येथे नातू विद्यालयाजवळ दापोलीकडून महाडकडे येणाऱ्या वेगवान कार चालकाचा कारवरील ताबा सुटल्याने कारला झालेल्या अपघातात सुदैवाने जीवित हानी टळली मात्र शंभर मीटर कार घसरत गेल्याचे स्थानिक रहिवाशांनी सांगितले

महाड-दापोली रस्ता लाटवण हद्दीपर्यंत निसरडा झाला असल्याने या मार्गावरून वाहने संथगतीने चालवण्याचे आवाहन सार्वजनिक बांधकाम विभाग महाड



यांच्याकडून बॅनर व प्रत्यक्ष वाहन चालकांना शिरगाव फाट्यावर थांबून करण्यात येते. या मार्गावर मे महिन्यापासूनच अपघातांची मालिका वारंवार चालू असतानाच शनिवारी रात्री अकराच्या सुमारास दापोली कडून महाडकडे वेगाने येणाऱ्या कारचालकाचा कारवरील ताबा सुटल्याने कारला कुर्ला दिवेकर वाडी येथील वळणावर अपघात झाला

महाड दापोली मार्गावरील कुर्ला गायकरवाडी जवळील नातू विद्यालयाजवळ यापूर्वी पुणे व महाड एसटी बसचा अपघात झाल्याचे उदाहरण ताजे असताना शनिवारी रात्री अकराच्या सुमारास दापोली बाजूकडून महाडकडे येणाऱ्या कार चालकाला येथील वळणावरती वेग नियंत्रणात आणण्यात अपयश आल्याने सदरची कार १०० मीटर अंतरापर्यंत घसरत गेल्याचे प्रत्यक्ष दर्शनी गावातील व्यक्तींनी सांगितले

सुदैवाने या गाडीमधील असणाऱ्या व्यक्तींना किरकोळ स्वरूपाची दुखापत झाली असली तरी हा सर्व प्रकार वेगाने कार चालवण्याने घडल्याचे निष्पन्न होत आहे सुदैवाने हा अपघात रात्रीच्या सुमारास घडल्याने या मार्गावर वाहनांची वर्दळ कमी होती. मात्र हा अपघात दिवसा झाला असता तर मोठा अनुचित प्रकार घडला असता असे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले.

## पोलादपूर येथील श्री काळभैरवनाथ देवस्थानचा नवरात्रौत्सव

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

पोलादपूर तालुक्यात विविध ग्रामदैवतांसह आदिशक्ती देवींच्या विविध अवतारातील मंदिरातील नवरात्रौत्सव सोमवार पासून सुरू होणार असताना पोलादपूर शहराचे आराध्य ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी देवस्थानचा नवरात्रौत्सव येत्या सोमवार (दि.२२) पासून सुरू होणार आहे. या सोहळ्याची सांगता येत्या २ ऑक्टोबरला पोलीस ठाण्यात विजयदशमीनिमित्त सीमोल्लंघनाने होणार आहे.

सोमवारी दुपारी २ वाजता पोलादपूरचे ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ मंदिरामध्ये घटस्थापना होणार आहे. सलग नऊ दिवस भजन आणि जागरण करण्यात येणार आहे. यासाठी पोलादपूर शहरातील नगरांमधील नागरिक भजन व जागरणाची व्यवस्था करणार आहेत. २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजता अध्यक्ष बाबूराव महाडीक यांच्याहस्ते सोनेपूजन होऊन सायंकाळी ५ वाजता सर्व नगरांच्या ग्रामस्थांच्या समावेशाने पोलीस ठाण्यात विजयदशमी सीमोल्लंघन होऊन रात्री आठ वाजता नवरात्रौत्सवाचा समारोप करण्यात येणार आहे.

पान १ वरून

### नवदुर्गेच्या जागराला प्रारंभ

उत्सवाचे वातावरण निर्माण होणार आहे.

जिल्ह्यामध्ये ग्रामीण व शहरी भागात गावागावात नाक्यानाक्यावर नवरात्रौत्सवाचा जल्लोष पाहायला मिळणार आहे. दांडिया, गरबासह वेगवेगळे उपक्रम या कालावधीत राबविले जाणार आहेत. लहान मुलांसाठी संगीत खुर्ची, चमचा गोठी अशा अनेक स्पर्धा होणार आहेत. तसेच काही ठिकाणी जाखडी हे पारंपरिक नृत्यांचे सादरीकरण केले जाणार आहे. काही ठिकाणी कबड्डी, कुस्ती स्पर्धादेखील भरविल्या जाणार आहेत. गुरुवारी (दि.०२) ऑक्टोबरला दुर्गा विसर्जनासह विजयादशमी(दसरा) साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी रावणाचा दहन केला जाणार आहे. तीन ठिकाणी दहनाचा कार्यक्रम होणार आहे. विशेष म्हणजे यंदाची शारदीय नवरात्र फक्त नऊ दिवसांची नसून पूर्ण दहा दिवसांची असणार आहे.

### भारत-पाक सीमेवर तणाव

पाकिस्तानी लष्कराकडून सातत्याने प्रत्यक्ष नियंत्रणरेषेवरून गोळीबार चालू आहे. पाकिस्तानी लष्कराने शनिवारी मध्यरात्री सीमेवरून गोळीबार केला. यामुळे पुन्हा एकदा सीमेवर तणाव निर्माण झाला आहे.पाकिस्तानी सैनिकांनी एलओसीजवळ छोट्या बंदुकांच्या सहाय्याने गोळीबार केला. त्यास भारतीय सैनिकांनी देखील जशास तसं प्रत्युत्तर दिलं. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानी सैनिकांनी कुपवाडामधील नौगाम भागात एलओसीजवळून चार राऊंड फायर केले. त्याच्या प्रत्युत्तरात भारतीय लष्कराने २० राऊंड फायर केले. त्यानंतर पाकिस्तानी सैनिकांनी गोळीबार थांबवला. या चकमकीत कोणीही जखमी झालेलं नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ही चकमक शस्त्रसंधीचं उल्लंघन मानलेली नाही. या चकमकीबद्दल भारतीय लष्कराने कोणतंही अधिकृत निवेदन दिलेलं नाही. मात्र, ही काही पहिली घटना नाही. यापूर्वी देखील अनेकदा अशा चकमकी घडल्या आहेत. बऱ्याचदा दहशतवाद्यांना सीमेवरून भारतात घुसता यावं यासाठी पाकिस्तानी लष्कर अशाप्रकारे गोळीबार करत असतं. अनेक वेळा भारतीय लष्कराने पाकिस्तानी सैन्य व दहशतवाद्यांचे असे प्रयत्न हाणून पाडले आहेत.

**घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडला**

सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला पुंछ जिल्ह्यात अशीच चकमक झाली होती. तेव्हा काही घुसखोर भारतात शिरण्याचा प्रयत्न करत होते. बालाकोट सेक्टरमधील सीमारेषेजवळ पाकिस्तानी लष्कराने गोळीबार केला होता. मात्र, भारतीय सैनिकांनी पाकिस्तानला जशास तसे प्रत्युत्तर दिले. तसेच घुसखोरीचा प्रयत्नदेखील हाणून पाडला होता.

### तळोजात तरूणीची हत्या

घरी आल्यानंतर तिला घरामध्ये तमन्ना रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसून आली. या घटनेची माहिती मिळताच तळोजा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी तळोजा पोलिसांनी अज्ञात मारेकऱ्याविरुध्द हत्येचा गुन्हा दाखल करुन या गुह्याचा तपास करण्यासाठी तांत्रिक तपास पथक, सीसीटीव्ही तपास पथक, आरोपीचा मागोवा घेणारे पथक, घटनास्थळ तपास पथक आणि एक फॉरेन्सिक पथक स्थापन केले होते. या तपास पथकांनी केलेल्या तपासात मृत तमन्ना हिचा नातेवाईक मोहम्मद अयुब त्यांच्या घरी आल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी रात्री उशिरा उल्हासनगर येथून आरोपी मोहम्मद अयुब याला ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीत त्याने तमन्नाची हत्या केल्याची कबुली दिल्यानंतर त्याला अटक करण्यात आली, अशी माहिती तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविण भगत यांनी दिली. या गंभीर घटनेची माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी नवी मुंबई पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते (परिमंडळ-३, पनवेल), पोलीस उपायुक्त (गुन्हे शाखा) सचिन गुंजाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) अजयकुमार लांडगे, खारघर विभाग सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम आदींनी भेट देऊन तपासाच्या दृष्टीने मार्गदर्शन केले.

### वसंत चौलकर यांचे निधन

अल्पशा आजारामुळे निधन झाले. रामनाथ येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, सतिश प्रधान आदी राजकीय सामाजिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रातील मंडळी, नातेवाईक, मित्रमंडळींनी उपस्थित राहून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

## ‘रिलायन्स कंपनीत ३२४ प्रकल्पग्रस्तांना कायम नोकरी द्या’

**पाली / वाघोशी :** रिलायन्स नागोठणे कंपनीकडून सातत्याने प्रकल्पग्रस्त प्राधान्य प्रमाणपत्र धारकांच्या प्रश्नावर टाळाटाळ सुरू असल्याने अन्यायग्रस्त ३२४ प्रकल्पग्रस्तांना कायम स्वरूपी नोकरी मिळावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य वंचित बहुजन माथाडी, ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियन आक्रमक पवित्रा घेतला आहे. येत्या ७ ऑक्टोबर पासून आझाद मैदान येथे ॲड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली बेमुदत उपोषण सुरू करण्यात येणार आहे.

दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ उलटूनही रिलायन्स नागोठणे कंपनीने या आदेशाची अंमलबजावणी केलेली नाही. शासनाच्या इतिवृत्तात कंत्राटी पद्धती असा कुठलाही उल्लेख नसतानाही कंपनीकडून केवळ टाळाटाळ व आडमुठा कारभार सुरू आहे. दरम्यान, कंपनीत हजारो कायमस्वरूपी कामगार निवृत्त झाले असतानाही प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याऐवजी मुद्दाम विलंब लावला जात असल्याचा आरोप युनियनने केला आहे.

# महादेव वाडीत स्मार्ट मीटरला आग

**।रोहा/धाटाव । प्रतिनिधी ।**

धाटाव विभागात महादेव वाडी येथे शनिवारी सकाळी भीषण घटना घडली. स्मार्ट मीटर बॉक्समधून अचानक धूर निघू लागला आणि काही क्षणांतच मोठी आग लागून ३ स्मार्ट मीटर जळून खाक झाले.

या घटनेमुळे संपूर्ण गावात घबराट पसरली व गावातील वीजपुरवठा खंडित झाला. सजग नागरिकांनी वेळेवर परिसर सुरक्षित करून मोठा अनर्थ टाळला. परंतु,महावितरणचे कर्मचारी तासनतास संपर्कातच आले नाहीत.

अखेर ग्रामस्थांनी प्रकाश सुतार यांच्या पुढाकाराने तळाघर येथील कर्मचारी दत्ता शिर्के यांना घटनास्थळी आणले.त्यांनी मुख्य



लाईन बंद करून आग लागलेल्या पेटीवर पाणी मारून मोठा अनर्थ टाळला.तत्पूर्वी पोलिसांनाही या प्रकरणाची माहिती देण्यात आली व त्यांनीही धाव घेतली, मात्र तोपर्यंत मीटर पूर्णपणे जळून गेले असल्याचे समोर आले आहे.

महावितरणच्या भरमसाठ वीजबिलांनी आधीच कंबरडे मोडले असल्याने त्यातच जीव धोक्यात घालणारे स्मार्ट मीटर या दोन्हींचा त्रास आम्ही किती काळ सहन करायचा? असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

# बळीराजा फाऊंडेशनने दिला सामाजिक संदेश

रोहा/धाटाव : विभागात शेती, पर्यावरण यांसह सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या मुख्यतः आंबेवाडी ते निवी कालव्याचा पाणी प्रश्न मार्गी लावलेल्या बळीराजा फाऊंडेशने शनिवारी विविध उपक्रमातून सामाजिक, पर्यावरण दृष्टिकोनाचा महत्वपूर्ण संदेश दिला. संस्थापक राजेंद्र जाधव, उपाध्यक्ष तुकाराम भगत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून निवी, वाशी शालेय विद्यार्थ्यांना स्पोर्ट गणवेश वाटप, वृक्षारोपण, भुवनेश्वर येथे बळीराजा फाउंडेशनच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले.

शालेय गणवेश वाटप सामाजिक कार्यकर्ते प्रदीप देशमुख, माजी सरपंच अनंत देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण सिटी ऑफ फ्लॉवर्सचे संस्थापक सुरेंद्र निंबाळकर यांच्या हस्ते तर नाम फलकाचे अनावरण वरसेचे सरपंच रामा म्हात्रे, उद्योजक राजेश मोरे, राम नाकती व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले

## अलिबाग-वडखळ
# रस्ता वादाच्या भोवऱ्यात

- दुरूस्तीच्या नावाखाली मातीचा भराव
- ठेकेदाराच्या मनमानी कारभारावर प्रवासी वर्गाचा संताप



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग-वडखळ महामार्गाच्या दुरुस्तीचे काम सध्या सुरु आहे. हे काम योग्य पद्धतीने होत नाही, असा आरोप केला जात आहे. त्यात दुरुस्तीच्या नावाखाली मातीचा भराव टाकला जात असल्याचेही बोलले जात आहे. निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत वादाच्या भोवऱ्यात सापडलेला अलिबाग-वडखळ राष्ट्रीय महामार्ग पुन्हा चर्चेत आला आहे. ठेकेदाराच्या मनमानी कारभाराबाबत प्रवाशी वर्गाकडून संताप व्यक्त केला जात आहे.

अलिबाग-वडखळ हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. या महामार्गाची सध्या मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले आहेत. पिंपळभाट, राऊतवाडी, खंडाळे, चेंढरे बायपास, तिनविरा ते चरी अशा अनेक ठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या रस्त्यावरून प्रवास करणे नकोसे झाले आहे. हे खड्डे चुकवताना अनेकवेळा अपघात झाले आहेत. त्यामध्ये या महामार्गावरून क्षमतेपेक्षा अधिक वजनाच्या अवजड वाहतूकीमुळे महामार्गाची परिस्थिती बिकट झाली आहे. खराब रस्त्यामुळे महामार्गावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे अर्ध्या तासाचे अंतर पार करण्यासाठी दिड तासांचा कालावधी लागत आहे.

दरम्यान, अलिबाग तालूका रस्ते संघर्ष समितीने या खराब रस्त्यांच्या विरोधात आवाज उठवला होता. त्यानंतर रस्त्याची दुरुस्ती करण्यास सुरुवात झाली. परंतु, रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. याबाबत शेतकरी कामगर पक्षाच्या प्रवक्ता तथा सोशल मिडिया सेलच्या अध्यक्ष चित्रलेखा पाटील व शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी ठेकेदाराला जाब विचारला. त्यानंतर पिंपळभाटपासूनचे खड्डे खडी व डांबरीकरण करून बुजवण्यात आले. मात्र, खंडाळेपासून पुढील खड्डेमय रस्त्यांवर मातीचा भराव टाकण्याचा प्रकार समोर आला आहे. याठिकाणी जेसीबीच्या मदतीने माती खड्ड्यात टाकण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे प्रवासी वर्गाकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

अलिबाग-वडखळ या महामार्गासांठी सुमारे २३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या महामार्गाच्या कामाचा ठेका देवकर अर्थमुव्हर कंपनीला देण्यात आला असून या कंपनीच्या ठेकेदारामार्फत खड्डे बुजविण्याचे काम केले जात आहे.

> **अर्थमुव्हर कंपनीला अलिबाग-वडखळ महामार्गाचे काम दिले आहे. त्या कंपनीने दुरुस्तीचे काम सुरू केले आहे. परंतु, रस्त्याची साईटपट्टी उंच झाल्याने पाऊस रस्त्यावर साचत आहे. परिणामी डांबरीकरण करण्यास अडथळे निर्माण होत आहेत. सध्या साईटपट्टी स्वच्छ करण्याचे काम केले जात आहे. त्यानंतर डांबरीकरण करून रस्ता योग्य केला जाईल.**
>
> **- शैलेंद्र गुंड, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभाग, वडखळ**

## फेसाळलेला समुद्रकिनारा..




● अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर उंच उसळणाऱ्या लाटांची मजा घेत पर्यटकांनी समुद्रस्नानाचा आनंद लुटला.

# महिलांची रस्त्यावर मच्छी विक्री

| तळा | प्रतिनिधी |

तळा शहरात मासळी बाजार नसल्याने महिलांवर रस्त्यावर मच्छी विक्री करण्याची वेळ आली आहे. अशावेळी अपघात घडल्यास जबाबदार कोण, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.



तळा शहरातील कुरुक्कर हॉस्पिटल समोर नवीन मासळी बाजाराची ईमारत उभी रहात आहे. सुरुवातीला या इमारतीचे काम युद्धपातळीवर सुरू होते; परंतु, निधी अभावी हळूहळू कामाची गती मंदावली. त्यामुळे गेल्या अडीज वर्षांपासून मासळी बाजार इमारतीचे काम अपूर्ण स्थितीत आहे. या इमारतीसाठी अंदाजित रक्कम ९१ लाख ४१ हजार ७०० एवढी असून नगरोथान योजनेच्या माध्यमातून ५८ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. उर्वरित ३३ लाख ४१ हजार ७०० रुपये ही रक्कम नगरपंचायतीला अद्याप प्राप्त झाली नसल्याने हे काम रखडले आहे. तळा बाजारपेठेत बसस्थानकाशेजारी असलेल्या जुन्या मासळी बाजारा योग्य सुविधा नसल्याने नाईलाजास्तव मच्छी विक्रेत्या महिलांना बाहेर रस्त्यावर बसावे लागत आहे. त्यामुळे एसटी लावण्यास अडचण निर्माण होत आहेत. याआधी एसटीच्या धडकेने येथील संरक्षक भिंत कोसळून मच्छीविक्रेत्या महिला गंभीर जखमी झाल्या होत्या. अशावेळी एखादा गंभीर अपघात घडला तर त्याची जबाबदारी नगरपंचायत प्रशासन घेणार का? असा प्रश्न पस्थित केला जात आहे.

## निवडक



### खारघरमध्ये सोनेरी कोल्ह्याचे दर्शन

**पनवेल :** खारघर येथे सोनेरी कोल्हा आणि भटके कुत्रे एकत्र वावरत असल्याचे व्हिडीओ काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध झाले होते. त्यामुळे सोनेरी कोल्ह्यांचा अधिवास आणि संरक्षणाचा मुद्दा त्यावेळी ऐरणीवर आला होता. आता पुन्हा एकदा खारघर वसाहतीत भटक्या कुत्र्यांसोबत फिरणारी सोनेरी कोल्ह्याची जोडी दिसून आली आहे. खारघर वसाहती शेजारी असलेल्या डोंगर रांगांमध्ये मोठ्या प्रमाणात जैवविविधता अस्तित्वात असून, विविध प्रकारचे पशु आणि पक्षी या ठिकाणी वास्तव्यास आहेत. खारघरमध्ये विकासासाठी होत असलेल्या कामांमुळे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली जात आहे. त्यामुळे या ठिकाणची जैवविविधता धोक्यात आली आहे. अशातच या ठिकाणी वास्तव्यास असलेले जंगली प्राणी अन्नाच्या शोधात मानवी वस्तीत घुसखोरी करू लागले आहेत.




### ॲड. विश्वनाथ भगत यांचा सन्मान

**रायगड :** अलिबाग तालुक्यातील देवा ग्रुप फाऊंडेशन आरोग्य विभागाचे कोकण प्रदेश सचिव ॲड. विश्वनाथ भगत यांना युवा महाराष्ट्र फाऊंडेशनतर्फे 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' देण्यात आला. हा पुरस्कार सिने अभिनेत्री हर्षिता ठाकुर, संस्थापक डॉ. अविनाश सकुंडे, अनुर्वी फाऊंडेशनचे रवी अग्रवाल आणि आनंदी युनिव्हर्स फाऊंडेशनचे गणेश विटकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार समाजसेवेच्या विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना दिला जातो. विश्वनाथ भगत यांचे कार्य पुढील पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे. पुरस्कार प्रदान करताना उपस्थित सर्व मान्यवरांनी त्यांच्या कार्याची प्रशंसा केली आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी समर्पित प्रयत्न करणाऱ्या विश्वनाथ भगत यांचे कार्य हे 'सेवा हीच खरी प्रतिष्ठा' या तत्त्वावर आधारित आहे.

### नेरे सरपंचाला ठरवले अपात्र

**नवीन पनवेल :** नेरे ग्रामपंचायतीचे भाजपचे सरपंच प्रकाश गोपाळ घाडगे यांना रायगड जिल्हाधिकारी यांनी अपात्र ठरवले आहे. याबाबतचा आदेश त्यांनी दिला आहे. प्रकाश घाडगे यांनी महाराष्ट्र शासन वन खाते अशी नोंद दाखल असलेल्या मिळकतीमध्ये निवासी कारणासाठी अतिक्रमण केले होते. त्यामुळे त्यांचे सरपंचपद रद्द करण्याबाबतचा अर्ज नेरे येथील शंकर गोपाळ ठाकूर यांनी दाखल केला होता. पनवेल तालुक्यातील नेरे येथील सर्वे नंबर २५८ या गा. न. नं. सातबारा कब्जेदार सदरी महाराष्ट्र शासन वन खाते अशी नोंद दाखल असलेल्या मिळकतीवर प्रकाश घाडगे यांनी अतिक्रमण केले आहे. त्यावर बांधलेल्या घर क्रमांक १५० अ चे सद्य:स्थितीमध्ये कायदेशीर वारस हे प्रकाश घाडगे हे असल्याने त्यांनी वनविभागाच्या जागेत अतिक्रमण केल्याचे सिद्ध होत असल्याचे जिल्हाधिकारी यांनी दिलेले आदेशात म्हटले आहे. त्यामुळे त्यांचे सरपंचपद रद्द करणे क्रमप्राप्त असल्याचे जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## पालीत बनावट पोलिसांची दहशत

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

पाली शहरात बनावट पोलिसांच्या नावाखाली लुटणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. राम आळी परिसरात दोन अनोळखी इसमांनी पोलीस असल्याची बतावणी करत ६९ वर्षीय वृद्ध महिलेला गंडा घालत तब्बल ५० हजार किमतीचे सोन्याचे दागिने बेमालूमपणे लंपास केले. त्या ठिकाणी काळ्या मोटारसायकलवर आलेल्या एकाने पांढरा शर्ट व काळी पॅन्ट, तर दुसऱ्याने खाकी कपडे घालून पोलीस असल्याचा आव आणला. त्यांनी महिलेचा विश्वास संपादन केला. त्यानंतर पांजली यांना दागिने पिशवीत ठेवण्यास भाग पाडले आणि तेथून ते दागिने घेऊन फरार झाले.

# तळवडे पूल खड्ड्यात

| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळमधील तळवडे येथे असलेल्या उल्हास नदी पुलावरील रस्ता अत्यंत खराब झाला आहे. या पुलावरील डांबरीकरण खराब झाल्याने दुचाकीस्वारांना रात्रीच्या वेळी प्रवास करणे धोकादायक बनले आहे. दरम्यान, हा रस्ता नव्याने करण्याआधी जेसीबीच्या साहाय्याने जुना रस्ता उखडून काढण्यात यावा, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ आत्माराम घोडविंदे यांनी केली आहे. उल्हास नदीवर कोल्हारे वाडी आणि तळवडे यांना जोडणारा पूल काही वर्षांपूर्वी सार्वजनिक बांधकाम खात्याने बांधला होता. या पुलामुळे या भागातील जनजीवन अधिक सुरळीत झाले. त्यानंतर या पुलासह परिसरातील मार्गांवर सार्वजनिक बांधकाम खात्याने अनेकदा करोडो रुपयांचा निधी खर्च केला आहे.



मात्र, या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने हा रस्ता खड्ड्यात गेला आहे. या ठिकाणी साधारण अर्धा ते एक फुटाचे खड्डे पडले आहेत. त्या खड्ड्यातून वाट काढणे वाहनचालक यांना धोक्याचे बनले आहे. त्यामुळे कर्जत सार्वजनिक बांधकाम विभागाने तळवडे पुलाच्या पृष्ठभागावर निर्माण झालेले खड्डे सपाट करून नंतर नव्याने दुरूस्ती करण्याची मागणी होत आहे.

# 'सीसीएस केंद्र' शासकीय, खासगी सेवा पुरविण्याचे महत्त्वाचे माध्यम

| अलिबाग | प्रतिनिधी |

सीएससी केंद्र हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध शासकीय आणि खासगी सेवा पुरविण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. महामंडळाने सीएससी केंद्रासमवेत केलेल्या करारामुळे महामंडळाच्या लाभार्थ्यांना लाभ घेण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची गरज भासणार नाही, त्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा वाचेल, अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त, अमिता पवार यांनी दिली आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे लाभार्थी आता त्यांच्या जवळच्या कोणत्याही सीएससी केंद्रावर जाऊन महामंडळाच्या योजनांचा लाभ कमी दरात घेऊ शकतात. त्यामध्ये महामंडळाच्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज भरणे, कागदपत्र अपलोड करणे, योजनेची सद्य:स्थिती तपासणे आणि आवश्यक मार्गदर्शन मिळवणे यांसारखा सुविधांचा समावेश आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यात असलेल्या गरजू आणि पात्र तरुणांपर्यंत महामंडळाच्या योजना पोहोचणार आहेत. कमी खर्चात आणि त्यांच्या घराजवळ त्यांना आवश्यक सेवा मिळाल्यामुळे त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करून मराठा समाजातील तरुणांना उद्योजक करण्याचे महामंडळाचा उद्देश पूर्णत्वास नेणे सोपे होईल.




### म्हसळ्यामध्ये गुटखा बंद, मटका सुरू

| म्हसळा | प्रतिनिधी |

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा वाहतूक व विक्री करण्यावर म्हसळा सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप कहाले यांच्या नेतृत्वाखाली उप पोलीस निरीक्षक एडवळे आणि पथकाने कारवाई करून कौतुकास्पद कामकेले आहे. त्यामुळे अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. पोलिसांच्या कठोर कारवाईमुळे शहरात गुटखा वाहतूक व विक्री तूर्तास बंद झाली असली तरी ऑनलाईन मटक्याने मात्र डोके वर काढले आहे. श्रीवर्धन शहरात छुप्या पद्धतीने मटका सुरू असल्याची चर्चा होत आहे. म्हसळा येथे कल्याण आणि मेन बाजार मटका व्यवसाय ऑनलाइन पद्धतीने सुरू असल्याने मटका खेळणारे लोक मोबाईलवर आकडे व रक्कम पाठवून, तर काही जण कागदावर आकडे उतरवून छुप्या पद्धतीने व्यवसाय करीत आहेत.

# पालिकेच्या बांधकाम विभागाच्या नावाने श्राद्ध

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिकेने परिसरातील रस्ते दुरुस्तीसाठी १०० कोटी खर्च केले आहेत. त्यामध्ये कामोठेमध्ये १० कोटी खर्च केले आहेत. परंतु, एवढा खर्च करून देखील कामोठ्यात खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवासी वर्गासह स्थानिकांनी वेळोवेळी पालिकेला निवेदन दिले आहे. मात्र, पनवेल महानगरपालिका पावसाकडे बोट दाखवत आहेत. त्यामुळे कामोठेकरांना संपूर्ण गणोत्सव खड्ड्यातून मार्ग काढत साजरा करावा लागला. दरम्यान, पालिकेने चार-पाच मजूर लावून तात्पुरती रस्तेवरील खडी साफ करण्याचा दिखावा केला होता. परिणामी येथील खड्ड्यांमुळे अनेक लहान-मोठे अपघात होत आहेत. त्यामुळे पालिकेच्या




डिसाळ कारभाराला कंटाळून १० दिवसांपूर्वी एकता सामाजिक संस्थेने रस्त्यावरील खडी साफ केली होती. तरीही पालिकेला काहीही फरक पडला नाही. त्यामुळे एकता सामाजिक संस्थेने सर्वपीत्री अमावस्याच्या दिवशी कामोठे पोलीस स्टेशन समोरील चौकात निषेध म्हणून पालिकेच्या रस्ते व बांधकाम खात्याचा फलक लावून श्राद्ध घालुन निषेध व्यक्त केला.



# डॉलर्सचा नळ बंद

भारतात जीएसटीचे नवे दर सोमवारपासून लागू होणार आहेत. त्यामुळे मोटारींपासून ते रोजच्या ब्रेडपर्यंत अनेक गोष्टी स्वस्त होतील व खरेदीची एकच लाट येईल अशी स्वप्ने सरकार, कंपन्या आणि व्यापारी पाहत होते. ही दिवाळीची भेट आहे असे खुद्द पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून सांगितले होते. पण ती दिवाळी होण्याआधीच डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयाने अंधार व्हायची वेळ आली आहे. अमेरिकेच्या एच वन बी व्हिसासाठीचे शुल्क एक लाख डॉलर म्हणजे सध्याच्या किमतीनुसार वर्षाला सुमारे ८८ लाख रुपये करण्यात आले आहे. सध्या हे शुल्क सुमारे चार ते पाच लाख रुपये आहे. भारतातला आयटी क्षेत्राचा बहर, त्यात मिळणारे अचाट पगार, अमेरिकेत धडाधड मिळणाऱ्या नोकऱ्या यांची चर्चा गेली २५ वर्षे चालू आहे. यात एच वन बी व्हिसा हा महत्वाचा घटक आहे. अमेरिकेत काम करण्यासाठी इथून आयटी किंवा इतर क्षेत्रातील इंजिनिअर इत्यादींना घेऊन जाण्यासाठी हा व्हिसा वापरला जातो. हा व्हिसा तीन वर्षांसाठी असतो व तो आणखी तीन वर्षे वाढवता येतो. दरवर्षी सुमारे तीन ते चार लाख एच वन बी व्हिसा दिले जातात. त्यातले बहुतांश भारतीय लोकांना मिळतात. गेल्या वर्षी दिलेल्या तीन लाख ९० हजार व्हिसापैकी ७१ टक्के म्हणजे सुमारे दोन लाख १० हजार व्हिसा भारतीय लोकांना मिळाले. केवळ ११ टक्के चिनी लोकांना मिळाले. सध्या अशा रीतीने भारतीय इंजिनिअर उर्फ कामगारांना अमेरिकेत घेऊन जाणाऱ्यांमध्ये अमेझॉन, गुगल, फेसबुक, मायक्रोसॉफ्ट इत्यादी कंपन्या आघाडीवर आहेत. आपल्या टीसीएस, इन्फोसिस या कंपन्यांतर्फेही असे हजारो कामगार सध्या तिकडे आहेत. अमेरिकी कायद्यानुसार याच कामांसाठी अमेरिकी नागरिकांना नोकरीला ठेवले तर भरमसाठ पगार द्यावे लागतात. त्याच्या कितीतरी कमी पैशात या भारतीय कामगारांना राबवले जाऊ शकते. अर्थात, भारतातून जाणाऱ्यांना डॉलरमध्ये मिळणारी ही रक्कम भारतात मिळणाऱ्या पगाराच्या कित्येक पट असते. त्यामुळे या प्रकरणात कंपन्या व हे अमेरिकेत जाणारे कामगार दोघेही खूष असतात.

### दिवाळीआधीचा अंधार

या कामगारांना आपल्या व्हिसाच्या आधारे आपली पत्नी वा पती आणि मुलांनाही अमेरिकेत नेता येते. तेथे शिक्षण घेता येते. दुसरी नोकरी पाहून तिथेच स्थायिक होण्यासाठी प्रयत्न करता येतात. याच रीतीने लाखो भारतीय गेल्या काही वर्षात अमेरिकेचे रहिवासी झालेले आहेत. हे लोक दरवर्षी अब्जावधी डॉलर्स भारतातील आपल्या कुटुंबियांना पाठवत असतात. घरे, मोटारी, चैनीच्या वस्तू यांची बाजारपेठ मोठी करण्याला अमेरिका व इतर देशांतून आलेले हे पैसे कारणीभूत आहेत. मात्र आता अमेरिकेतील हा डॉलर्सचा नळ बंद होण्याची भीती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे आयातशुल्क लागू केले तेव्हा ट्रम्प यांनी आयटी क्षेत्राला वगळले होते. अमेरिकेतून भारताला मिळणाऱ्या उत्पन्नात आयटीचाच मोठा वाटा होता. त्याकडे आज ना उद्या ट्रम्प वरवंटा फिरवणार हे उघड होते. याच मालिकेत पुढचा प्रहार औषध कंपन्यांवर होणार आहे. सध्या आयातशुल्कातून त्यांना वगळले होते. अमेरिकेत सध्या सुमारे सात लाख भारतीय एच वन बी व्हिसावर आहेत. या व्हिसाची मुदत संपेपर्यंत म्हणजे फार तर एक ते दोन वर्षे ते तेथे राहू शकतील. नंतर मात्र त्यांना ८८ लाखांचे जबर शुल्क भरून व्हिसा नूतनीकरण करावे लागेल. शिवाय तो मिळेलच याची खात्री नाही. एक तर या व्हिसाचे शुल्क सध्या बहुदा कंपन्याच भरतात. आता मात्र त्या शेकडो वेळा याचा विचार करतील. एखाद्याच्या नुसत्या व्हिसासाठी दरवर्षी ८८ लाख रुपये भरण्याइतकी त्याची गरज आहे काय याचा विचार कोणतीही कंपनी करणारच. त्यातून आज एआयचा वापर वाढला आहे. त्यामुळे या नोकऱ्यांमध्ये कपात होण्याचीच शक्यता अधिक आहे. अर्थात, आयटीमध्ये कोडिंग, क्वांटम कॉम्पुटिंग किंवा अन्य अशी काही क्षेत्रे आहेत की त्यासाठी अमेरिकेत चांगले स्थानिक लोक उपलब्ध होत नाहीत. त्यामुळेच तर भारतातील आयटीवाल्यांना इतकी मागणी आहे. त्यामुळे याचाही विचार कंपन्यांना करावा लागेलच.

### मोदीभक्त जमिनीवर

याचे दोन परिणाम संभवतात. एक म्हणजे या कंपन्या हेच काम तिकडे करण्याऐवजी भारतात किंवा अमेरिकेजवळच्या अन्य देशात करून घेऊ शकतात. म्हणजे आज अमेरिकेत जी रोजगारनिर्मिती होते ती आता भारतात येऊ शकेल. ट्रम्प यांना जे साधायचे आहे त्याच्या बरोबर उलटा असा हा परिणाम आहे. याउलट समजा ट्रम्प यांच्या दणक्यामुळे अमेरिकी लोकांना नोकऱ्या दिल्या जाऊ लागल्याच तर भारतीय आयटी तरुणांना नाइलाजाने भारतातच राहावे लागेल. इथेच काही व्यवसाय करावे लागतील. भारतासाठी हे भल्याचे ठरेल असे अनेकांना वाटते. पण अमेरिकेच्या तोडीचे वातावरण, साधने व पैसा येथे नाही म्हणून तर आपले तरूण आजवर तिकडे जात होते. ते येथे एकाएकी थांबून नवनवीन शोध लावतील किंवा तंत्रज्ञानात क्रांती करून व्यवसाय वाढवतील अशी अपेक्षा करणे धाडसाचे आहे. अर्थात, अमेझॉन, मायक्रोसॉफ्ट इत्यादी कंपन्यांनाही या निर्णयाचा जबर फटका बसणार आहे व त्यांचे प्रकल्प अडचणीत येणार आहेत. त्यामुळे त्या ट्रम्प यांच्यावर दबाव आणून हा निर्णय बदलायला किंवा हे शुल्क कमी करायला भाग पाडतात का हे पाहावे लागेल. ट्रम्प यांनी आजवर असे अनेक निर्णय उलटे फिरवले आहेत. त्यामुळे हाही माघारी घेतला गेला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. ट्रम्प यांनी गेल्या आठ महिन्यात नेम धरून भारतावर जो मारा केला आहे तो मात्र अभूतपूर्व आहे. नरेंद्र मोदी यांनी माय फ्रेंड डोलांड असा कितीही गजर केला व त्यांच्या प्रचारसभेत जाऊन अबकी बार ट्रम्प सरकार असा नारा दिला तरी ट्रम्प त्या खुषमस्करीला भुलत नाहीत. त्यामुळेच त्यांनी भारतावर जगात सर्वाधिक असे ५० टक्के आयातशुल्क लागू केले आहे. युक्रेनचे युध्द चालू राहण्याला भारताला जबाबदार धरले आहे. ट्रम्प यांची खुषामत करून आपण वाटेल ते पदरात पाडून घेऊ शकतो असा खास बनिया पध्दतीचा विचार मोदी व त्यांचे भक्त करत होते. त्यांना ट्रम्पबुवांनी दिलेला हा पहिला दणका होता. अलिकडेच इराणमधील चाबहार बंदरातील भारतीय कामावर निर्बंध लागू करून दुसरा दणका दिला व आता हा व्हिसाचा तिसरा दणका आहे. मोदींच्या वाढदिवसाला ट्रम्प यांनी फोन करून शुभेच्छा दिल्या म्हणून खूष झालेले भक्त आता ताळ्यावर येतील. भारत व अमेरिका यांच्यात ५० टक्के आयातशुल्क कमी करण्याबाबत व नव्या व्यापारी कराराबाबत पुढील आठवड्यात वाटाघाटी होणार आहेत. त्या सोप्या राहणार नाहीत.

## विचार

# महागाई घटणार, कर्जदर उतरणार

*येत्या काळात महागाई दर कमी राहणार आणि कर्जाचा व्याजदर कमी होणार, या बातमीमुळे सरत्या आठवड्यामध्ये अर्थनगरीला दिलासा मिळाला. दुसरीकडे, वाहने भंगारात काढली तर ४० हजार कोटींचा फायदा होणार असल्याच्या आणि एचडीएफसी बँक, स्टेट बँक जगात अव्वल ठरत असल्याच्या शुभवार्ता समोर आल्या. याखेरीज काही ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किंमती जीएसटी बदलानंतरही तशाच का राहिल्या हे ही उलगडले.*



**महेश देशपांडे**

वेगवान आर्थिक घडामोडींच्या काळात सरता आठवडा अर्थनगरीसाठीही धकाधकीचा राहिला, असे म्हणता येईल. त्यातल्या त्यात महागाई दर कमी राहणार आणि कर्जाचा व्याजदर कमी होणार, या बातमीमुळे दिलासा मिळाला. दुसरीकडे, वाहने भंगारात काढली तर ४० हजार कोटींचा फायदा होणार असल्याच्या आणि एचडीएफसी बँक, स्टेट बँक जगात अव्वल ठरत असल्याच्या शुभवार्ता समोर आल्या. याखेरीज काही ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किंमती जीएसटी बदलानंतरही तशाच का राहिल्या हे ही उलगडले.

अलीकडेच किरकोळ महागाईचे आकडे समोर आले आहेत. जुलैच्या तुलनेत ऑगस्ट महिन्यात किरकोळ महागाई पुन्हा एकदा दोन टक्क्यांपेक्षा जास्त झाली. तथापि, याबद्दल घाबरण्याची गरज नाही. तज्ज्ञांच्या मते चालू आर्थिक वर्षात कोअर महागाई ३.२ टक्क्यांवर राहू शकते, जी मागील अंदाजापेक्षा कमी आहे. दुसरीकडे, चालू आर्थिक वर्षात रिझर्व्ह बँक सामान्य लोकांना ईएमआय कपातीच्या स्वरूपात त्याचा फायदा देऊ शकते. गेल्या अनेक महिन्यांपासून महागाईच्या आकड्यात घट दिसून येत आहे; परंतु ऑगस्ट महिन्यात अन्न उत्पादनांच्या किमती वाढल्यामुळे एकूण महागाईच्या आकड्यात वाढ झाली आहे. 'क्रिसिल' या रिसर्च अँड रेटिंग फर्मनुसार २०२५-२६ या आर्थिक वर्षात कोअर महागाई ३.२ टक्के राहण्याचा अंदाज आहे. तो त्याच्या पूर्वीच्या ३.५ टक्क्यांपेक्षा कमी आहे. 'क्रिसिल'ने ताज्या अहवालात म्हटले आहे की चालू आर्थिक वर्षात ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) मध्ये १.४ टक्के घट झाल्याचे दिसून येते. त्यामुळे आर्थिक सुलभतेला वाव मिळण्याची शक्यता आहे. अहवालात म्हटले आहे, की रिझर्व्ह बँक या वर्षी व्याजदरात २.५ टक्के कपात करू शकते. 'क्रिसिल'च्या मते जागतिक स्तरावर वाढत्या प्रतिकूल परिस्थितीसह कमी महागाई आणि कमी व्याजदरांमुळे अर्थव्यवस्थेत देशांतर्गत मागणी वाढेल. अहवालात असेही म्हटले आहे की खरीप हंगामात जास्त पाऊस हा धोका आहे, कारण त्यामुळे पंजाबसारख्या प्रमुख फलोत्पादन आणि अन्नधान्य उत्पादक क्षेत्रात व्यत्यय येऊ शकतो.

अहवालात पुढे म्हटले आहे की अन्न महागाई कमी पातळीपासून वाढू लागली आहे; परंतु तरीही मुख्य चलनवाढीपेक्षा मागे आहे.

ऑगस्टमध्ये किरकोळ महागाई दर मासिक आधारावर २.०७ टक्क्यांवर पोहोचला. भाज्या, मांस आणि माशांच्या किमती वाढल्यामुळे महागाई दर वाढला. जुलैमध्ये तो १.६१ टक्के होता. ग्राहक किंमत निर्देशांका (सीपीआय)मध्ये नऊ महिन्यांपासून सतत घसरण झाल्यानंतर महागाईमध्ये ही वाढ झाली आहे. नोव्हेंबर २०२४ पासून हा निर्देशांक कमी होत होता. तथापि, ग्राहक किंमत निर्देशांका(सीपीआय) वर आधारित महागाई वार्षिक आधारावर कमी झाली आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये ती ३.६५ टक्के होती. या काळात अन्न महागाई दर शून्यापेक्षा कमी होता. म्हणजेच तो ०.६९ टक्क्यांनी कमी झाला.

दरम्यान, जीएसटी सुधारणांमुळे ऑटो क्षेत्राला सर्वाधिक फायदा होऊ शकतो असा तज्ज्ञांचा अंदाज समोर आला. त्यामुळेच ऑटो कंपन्यांनी आपल्या वाहनांच्या किंमती कमी करण्याची घोषणा केली आहे. दुसरीकडे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कमाईचा एक नवीन मंत्र दिला आहे. यासोबतच त्यांनी ऑटो उद्योगाला एक मोठा संदेशही दिला आहे. देशातील सर्व ९७ लाख अयोग्य आणि प्रदूषित वाहने रद्द केली, तर भारताला जीएसटीमधून ४० हजार कोटी रुपयांचा फायदा होऊ शकतो, असे गडकरी म्हणाले. या व्यापक स्वच्छता मोहिमेमुळे केवळ सरकारी महसूल वाढणार नाही, तर ७० लाख रोजगार निर्माण होतील. तसेच पाच वर्षांमध्ये जगातील पहिल्या क्रमांकाचा ऑटोमोबाईल उद्योग बनण्याच्या भारताच्या प्रयत्नांना बळकटी मिळेल. एका अहवालानुसार, स्क्रॅपिंगची सध्याची स्थिती खूपच सामान्य आहे. ऑगस्ट २०२५ पर्यंत फक्त तीन लाख वाहने स्क्रॅप करण्यात आली आहेत. त्यापैकी १.४१ लाख सरकारी मालकीची होती. दरमहा सरासरी १६ हजार ८३० वाहने स्क्रॅप केली जात आहेत. ही परिसंस्था तयार करण्यासाठी खासगी क्षेत्राने २७०० कोटी रुपये गुंतवले आहेत.

भारताच्या वाहन स्क्रॅपिंग धोरणाला 'व्हॉलंटरी व्हेईकल फ्लीट मॉडर्नायझेशन प्रोग्राम' (व्ही-व्हीएमपी) असेही म्हणतात. ते पर्यावरणपूरक पद्धतीने जुन्या, असुरक्षित आणि प्रदूषणकारी वाहनांना टप्प्याटप्प्याने काढून टाकण्यासाठी डिझाइन केले आहे. गडकरी यांनी ऑटोमोबाईल उत्पादकांना नवीन वाहन खरेदी करताना स्क्रॅपेज प्रमाणपत्र सादर करणाऱ्या ग्राहकांना किमान पाच टक्के सूट देऊन स्क्रॅपिंगला प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. स्क्रॅपिंग आणि रिप्लेसमेंटचे चक्र उद्योगाची मागणी मजबूत ठेवू शकते. गडकरी यांच्या मते, स्क्रॅपेज धोरणाची प्रभावी अंमलबजावणी ऑटोमोबाईल घटकांच्या किमती २५ टक्क्यांपर्यंत कमी करू शकते, कारण पुनर्विनीकरण केलेले स्टील, ॲल्युमिनियम आणि इतर साहित्य पुरवठा साखळीत परत आणले जाईल. तसेच, ९७ लाख अयोग्य वाहने टप्प्याटप्प्याने काढून टाकल्याने उत्सर्जन कमी होईल, गडकरी यांच्या मते भारताच्या सध्याच्या ऑटोमोबाईल उद्योगाचा आकार २२ लाख कोटी रुपये आहे, तर चीनचा ४७ लाख कोटी रुपये आणि अमेरिकेचा ७८ लाख कोटी रुपये आहे. आपण पुढील पाच वर्षांमध्ये भारताचा ऑटोमोबाईल उद्योग जगात क्रमांक एकचा बनवू, असे गडकरी म्हणाले. भारत सध्या कच्च्या तेलाच्या आयातीवर दर वर्षी २२ लाख कोटी रुपये खर्च करतो. या आयातीशी संबंधित प्रदूषणामुळे ही समस्या आणखी गंभीर बनली आहे.

आता ग्राहकवर्गाने लक्ष देण्याजोगी एक बातमी. ग्राहकोपयोगी वस्तू कंपन्यांनी (एफएमसीजी) कर अधिकाऱ्यांना स्पष्ट केले आहे, की ते कमी किमतीच्या लोकप्रिय उत्पादनांच्या किमती कमी करणार नाहीत. यामध्ये पाच रुपयांचा बिस्किटपुडा, दहा रुपयांचे साबण आणि वीस रुपयांची टूथपेस्ट यासारख्या उत्पादनांचा समावेश आहे, तर यावरील कर दर कमी करण्यात आला आहे, त्यानंतर त्यांच्या किमती कमी व्हायला हव्यात. कंपन्यांचा युक्तिवाद आहे, की ग्राहकांना या वस्तू निश्चित किमतीत खरेदी करण्याची सवय आहे. त्यांच्या किमती ९ किंवा १८ रुपयांपर्यंत कमी केल्यास ग्राहकांमध्ये गोंधळ निर्माण होईल आणि व्यवहारामध्ये गैरसोय होईल. त्याऐवजी कंपन्यांनी केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाला (सीबीआयसी) ते अशा उत्पादनांची किंमत तशीच ठेवतील, असे सुचवले आहे. असे असले तरी ते पाकिटातील वस्तूचे प्रमाण वाढवतील. म्हणजेच, एखादा ग्राहक २० रुपयांचा बिस्किटपुडा खरेदी करत असल्यास त्याला पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात बिस्किटे मिळतील. अहवालानुसार, अनेक मोठ्या एफएमसीजी कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, की, समान किमतीत जास्त प्रमाणात उत्पादन दिल्यास, कमी केलेल्या जीएसटीचा फायदा ग्राहकांना कोणत्याही अडचणीशिवाय पोहोचेल.

'बिकाजी फूड्स'चे 'सीएफओ' ऋषभ जैन यांनी पुष्टी केली की कंपनी लहान पॅकेटचे वजन वाढवेल; जेणेकरून ग्राहकांना जादा प्रमाणात तीच वस्तू मिळेल. त्याच वेळी, 'डाबर'चे सीईओ मोहित मल्होत्रा म्हणाले की त्यांची कंपनी जीएसटी कपातीचा फायदा ग्राहकांना निश्चितपणे देईल. कमी करमुळे प्रत्येक उत्पादनाची मागणी वाढण्याची शक्यता आहे. अर्थ मंत्रालयाचे अधिकारी या संपूर्ण प्रकरणावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. याच सुमारास एका लक्षवेधी माहितीनुसार भारत सतत जगातील बँकिंग क्षेत्रात आपली ताकद वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. यानुसार देशाचे पुढील लक्ष्य आहे की २०४७ पर्यंत देशातील किमान दोन सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा समावेश जगातील टॉप २० बँकांमध्ये होणार आहे. सध्या, मालमत्तेच्या आधारावर फक्त स्टेट बँक आणि एचडीएफसी बँक जागतिक कर्ज देणाऱ्यांच्या टॉप १०० यादीमध्ये आहेत. अलिकडेच पार पडलेल्या दोनदिवसीय पीएसबी मंथन परिषदेत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये कॉर्पोरेट प्रशासन मजबूत करणे, ग्राहकांचा अनुभव सुधारणे आणि आधुनिकीकरणाद्वारे जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवणे हे मुख्य मुद्दे होते. सायबर सुरक्षा, कार्यबल परिवर्तन, जोखीम व्यवस्थापन आणि वैयक्तिक बँकिंग यासारखे विषयदेखील अजेंड्यामध्ये समाविष्ट होते. जागतिक अनिश्चिततेचा संदर्भ देत या प्रकरणाशी संबंधित एका अधिकाऱ्याने सांगितले की, आमचे उद्दिष्ट सार्वजनिक बँकांना भविष्यासाठी तयार करणे आणि त्यांची क्षमता वाढवून पद्धतशीरपणे वाढ करणे आहे. चांगली स्वायत्तता आणि पुढील स्तरावरील वाढ यावरही चर्चा केली जात आहे. नोंदीनुसार औद्योगिक कर्जाची मागणी कमकुवत राहिली आणि मोठ्या उद्योगांना दिली जाणारी कर्जे एक टक्क्यांपेक्षा कमी प्रमाणात वाढली.

## चर्चा आजची

# लाखो नोकरदारांवर 'एआय'ची गदा

**वैष्णवी वाडकर**

मायक्रोसॉफ्ट सारख्या नामांकित अमेरिकन कंपनीने मे महिन्यात ६००० कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढून टाकले. हे धक्कादायक असले तरी ही सत्यपरिस्थिती आहे. या मागचे कारण म्हणजे तंत्रज्ञानातील सर्वात मोठा बदल. कृत्रिम बुद्धीमता म्हणजे आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय) हा एक तंत्रज्ञानातील मोठा बदल आहे. हे तंत्रज्ञान संगणकाद्वारे हुबेहूब मानवी बुद्धिमत्तेप्रमाणे नक्कल करू शकते. कोडींग, सॉफ्टवेअर डेव्हलोपमेंट, अर्थशास्त्र, रिसर्च, थेरपी, फोटो जनरेशन, चित्रकला अशी अनेक मानवी बुद्धिमत्तेची कामे ते करू शकते. त्यामुळे सध्या लाखोंच्या नोकरीवर एआयची गदा असल्याची चर्चा तरूण वर्गात होत आहे.

एआय सारखे तंत्रज्ञान आजकाल सर्वसामान्यांपासून ते मोठंमोठ्या बिझनेसमॅनपर्यंत वापरले जाते. अशा प्रकारचे तंत्रज्ञान अस्तित्वात येणं म्हणजे वैज्ञानिक जादूच म्हणावी. अशा प्रकारच्या तंत्रज्ञानामुळे आता जग एवढं बदलत चाललं आहे की, बसल्याबसल्या जगात कुठे काय चाललं आहे, त्याची माहिती काही सेंकदात मिळवू शकतो आणि इतरांपर्यंत पोहोचवू शकतो. असे तंत्रज्ञान हे आताच्या धावपळीच्या युगात खुप फायद्याचे ठरत आहे. परंतु, एखाद्या गोष्टीचे जेवढे फायदे असतात तेवढेच तोटेही असताताच. व्हिडिओ एडिटिंग, रिसर्च, कोडींग, व्हॉईसओव्हर, कन्टेन्ट रायटिंग, मार्केटिंग, प्रॉब्लेम सोलविंग यांसारख्या एक ना अनेक गोष्टींसाठी स्वतंत्र टूल्स गुगलवर उपलब्ध आहेत. एवढंच नव्हे तर वर्षानुवर्षे पोलीस ज्या गुन्ह्यांची उकल करत आहेत ते गुन्हे देखील एआयच्या मदतीने सोडवण्यास पोलीस यशस्वी ठरत आहेत. एआय तंत्रज्ञाचे काही खास तोटे नसले तरी त्याचा मोठ्याप्रमणात परिणाम हा मानवी आयुष्यावर पडत आहे. एआयचा गैरफायदा किंवा त्याच्यामुळे नोकरदारांवर गदा येणं, अशा प्रकारच्या गोष्टी सध्या होत आहेत. एआयचे गॉडफादर म्हटले जाणारे जेफरी हिलटॉन यांनी म्हटले होते की, भविष्यात सर्वाधिक 'व्हाईट कॉलर' नोकऱ्या एआयने बदलल्या जाणार आहेत. आणि त्याचा प्रत्यय आता येत आहे. अगदी छायाचित्रणापासून ग्राहक सेवा ते आयटी क्षेत्रापर्यंत सर्वत्र एआयने आपले जाळे फेकल आहे. त्यामुळे कंपन्यांचा फायदा होत असला तरी त्यात नोकरदारांचा बळी पडत आहे.

एआयचे पहिले मॉडेल 'चॅटजीपीटी ३.५' हे नोव्हेंबर २०२२ला प्रक्षेपित केले गेले आणि त्यांनतर क्षणात नोकरदारांचे भविष्यच बदलले. त्यावेळी चॅटजीपीटी प्रक्षेपण कार्यक्रमामध्ये सांगण्यात आले होते की, चॅटजीपीटी तुम्ही विचाराल त्या प्रश्नाचे उत्तर अगदी काही सेकंदात देऊ शकते. एवढेच नव्हे तर तुमचा मानसिक उपचारदेखील (थेरपी) चॅटजीपीटी करू शकते. त्यानंरत लगेचच मांयक्रोसॉफ्ट, ॲमेझॉन, आयबीम, इंटेल यांसारख्या मोठंमोठ्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या जवळपास १ लाखहून अधिक कर्मचाऱ्यांना कामावरून काढण्यात आले. त्याचे कारण म्हणजे, जिथे मानवी बुद्धीला कोडींग, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, रिसर्च, यांसारखी अनेक तांत्रिक कामे करायला १ किंवा २ दिवस लागतात, तिथेच चॅटजीपीटी काही मिनिटांमध्ये हे कामे पूर्ण करते. त्यामुळे कंपनीचा वेळ आणि आर्थिक खर्च दोन्ही वाचते.

काही महिन्यांपूर्वी सोशल मीडियावर 'घिब्ली आर्ट' नावाचा ट्रेंड प्रचंड चालत होता. 'हयाओ मियाझाकी' नावाच्या जपानी ॲनिमेशन कलाकाराने घिब्ली आर्ट तयार करायला ४० वर्षे लावली होती. त्यातून त्यांनी हजारो लोकांना रोजगार दिला. मात्र, एआयने काही क्षणात त्यांच्या एवढ्या वर्षांच्या मेहनतीवर पाणी फेरले. चॅटजीपीटी किंवा अन्य कुठल्याही घिब्ली आर्ट तयार करणाऱ्या संकेतस्थळांवर आपला कोणताही फोटो टाकून ते आर्ट तयार करण्यासाठीचा मजकूर टाकल्यावर काही मिनटांत घिब्ली आर्टचे फोटो तयार होतात. त्यावेळी हयाओ मियाझाकी यांनी एआयच्या घिब्ली आर्टबाबात प्रचंड संताप व्यक्त केला. हा मानवी जीवनाचा अपमान असल्याचे मला ठामपणे वाटते, असेदेखील ते त्यावेळी म्हणाले होते.

त्यानंतर विंटेज एआय फोटो ट्रेंडने सोशल मीडियावर धुमाकूळ घातला होता. या ट्रेंडमध्ये 'जेमीनाय एआय'च्या संकेतस्थळावर आपला फोटो आणि गरजेचा मजकूर टाकला की, अगदी कौशल्याधारक फोटोग्राफर जसे विंटेज फोटो काढू शकतो, हुबेहूब तसे फोटो जेमीनाय बनवून देतो. अनेकांनी वेगवेगवेगळ्या सेलिब्रिटींसोबत देखील एआयच्या माध्यमातून फोटो तयार केले. त्याचबरोबर जी व्यक्ती आज हयातीत नाही त्या व्यक्तीसोबत देखील एआयद्वारे फोटो तयार करण्यात आले. या सगळ्या ट्रेंड्समुळे कौशल्यधारक छायाचित्रकारांवर होणार अन्याय स्पष्टपणे दिसून येतो.

या तंत्रज्ञानाच वाढता वापर आता थांबवणे अशक्य असले तरी त्याचा योग्य वापर कसा करायचा, हे मानवी हातात आहे. मानवी बुद्धिमत्ता, सर्जनशीलता आणि भावनिक जाण या गोष्टी कोणत्याही तंत्रज्ञानाला पूर्णपणे आत्मसात करता येणार नाही. त्यामुळे एआयला धोका मानण्याऐवजी त्याचा उपयोग आपली कौशल्ये अधिक विकसित करण्यासाठी आणि नव्या संधी निर्माण करण्यासाठी करणे हीच खरी गरज आहे. अन्यथा लाखोंच्या नोकऱ्यांवर आलेली गदा किती खोलवर घाव घालेल, याचा अंदाज बांधणे कठीण होऊन बसेल, अशी चर्चा नोकरदारांमध्ये होत आहे.

## लोकसंसद

### दादासाहेब फाळके पुरस्कारप्राप्त मोहनलाल यांचे अभिनंदन!

भारतीय चित्रपटसृष्टीत अतुलनीय आणि संस्मरणीय योगदानासाठी देण्यात येणारा सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्कार यंदा मल्याळम चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार मोहनलाल (मोहनलाल विश्वनाथन नायर) यांना जाहीर झाला आहे. २१ मे १९६० रोजी केरळ राज्यातील एलांथूर येथे जन्म झालेल्या मोहनलाल यांनी चार दशकांहून अधिक काळ प्रामुख्याने मल्याळम, तमिळ, कन्नड, तेलगू आणि हिंदी या भाषांमधील ३६० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. किरीदम, भरतम, वानप्रस्थम, दृश्यम, 'स्पॅडिकम', 'थन्माथरा', 'थुवानाथुंबिकल', 'नेरम' आणि इतर अनेक चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका अविस्मरणीय ठरल्या आहेत. मोहनलाल यांनी १९७८ मध्ये वयाच्या १८ व्या वर्षी मल्याळम चित्रपट थिरनोट्टम मधून चित्रपटसृष्टीत पदार्पण केले, भारत सरकारने त्यांना २००१ साली 'पद्मश्री 'आणि २०१९ मध्ये 'पद्मभूषण' पुरस्काराने सन्मानित केले आहे. केरळ राज्याच्या अनेक चित्रपट पुरस्कारांसह पाच राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार तसेच देशात आणि परदेशात अनेक सन्मान प्राप्त करणाऱ्या मोहनलाल यांच्या शिरपेचात सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्काराने आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. दादासाहेब फाळके पुरस्कारप्राप्त मोहनलाल यांचे हार्दिक अभिनंदन!

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे,**

### वाईटावर चांगल्याचा विजय

अश्विन महिन्यातील शुक्ल पक्षाच्या प्रतिपदा तिथीपासून शारदीय नवरात्रीला सुरुवात होते. हा सण वाईटावर चांगल्याचा विजय, धर्म आणि न्यायाची स्थापना दर्शवतो. नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये अनेक भक्त उपवास पकडतात तर काही लोक नऊ दिवस चपला घालत नाहीत. त्याच प्रकारे नवरात्र उत्सवात सगळ्यात जास्त खेळला जाणारा खेळ म्हणजे गरबा खास करून गुजरातसह काही प्रमाणात महाराष्ट्र आणि इतर वेगवेगळ्या राज्यांत सुद्धा गरबा खेळल्या जातो. तसेच अनेक भागात दांडिया खेळ सुद्धा खेळतात महिला वर्ग नवरात्रीला वेगवेगळ्या नऊ रंगाच्या साड्या परिधान करतात गावागावात दुर्गा मातेची प्रतिष्ठापना करुन पहाटे दौड असते त्यामुळे सर्वत्र उत्साहाचे आणि प्रसन्न वातावरण संचारते !

**– राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

## दिनविशेष

# स्त्रीशक्तीचे जागर करणाऱ्या नवरात्र उत्सव...!

'नव' म्हणजे नऊ आणि 'रात्री' म्हणजे रात्र या नऊ रात्रींमध्ये भक्त दुर्गा देवीच्या विविध रुपांची पूजा करतात. तसेच देवीचे घट बसवून व्रत करतात. या शारदीय नवरात्र उत्सवात घटस्थापना केली जाते. नवरात्र उत्सव हा सण वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे. पौराणिक कथेनुसार देवीने महिषासुर राक्षसाचा वध करून नकारात्मक शक्तीचा नाश केला. त्यामुळे हा उत्सव दैवी स्त्रीत्वाचा आदर सन्मान करण्यासाठी साजरा केला जातो. स्त्री आपल्या शक्तीने वाईट प्रवृत्तीचा संहार करून आपले व इतरांचे देखील रक्षण करु शकते हेच देवी दुर्गाने महिषासुर राक्षसाचा वध करून दाखवून दिले होते.

नवरात्रीच्या पहिल्या दिवशी अनेकजण घरात देवीची मूर्ती किंवा फोटो ठेवून घटाची स्थापना करतात. हा घट म्हणजे देवीच्या पुढे एक परडी ठेवून त्यात माती टाकली जाते व त्या मातीत पहिल्या दिवशी धान्य टाकतात. मग नऊ दिवस या घटाला पानांच्या फुलांच्या वेगवेगळ्या माळा बांधतात व पाणी घालतात. नऊ दिवसात ते धान्य उगवते व घट पूर्ण होतो. या नऊ दिवसांत दुर्गा देवीच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. देवीला प्रसन्न करण्यासाठी विविध मंत्र आणि स्तोत्र पठण करतात.

नवरात्रोत्सव हा देवीच्या नऊ दिवसांच्या व्रतांसाठी ओळखला जातो. अनेक भक्त देवीला प्रसन्न करण्यासाठी नऊ दिवस कडक उपवास ठेवतात. हा उपवास काहीजण फक्त फळे खाऊन करतात तर काहीजण केवळ पाण्यावर व्रत करतात. याकाळात अनेकजण चामड्याच्या वस्तू धारण करत नाहीत. तर नऊ दिवस व्रत करणारे भक्त यावेळी चप्पल घालत नाहीत. नवमी झाल्यानंतर दशमीला म्हणजेच दसऱ्याच्या दिवशी देवीची पूजा करून घट विसर्जित केल्यानंतर हे व्रत सोडतात.

महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये दांडिया आणि गरबा उत्सवांचे आयोजन नवरात्रात मोठ्या प्रमाणावर केले जाते. तरुणाई या उत्सवात जोशात सहभागी होतात. घागरा, चनियाचोली आणि पारंपरिक वस्त्रे परिधान करून मुले मुली गरबा आणि दांडिया खेळतात. जल्लोषात नृत्य करून आनंद लुटतात. यावेळी पारंपरिक नृत्य केले जातात. गरबा व दांडियाच्या स्पर्धा देखील अनेकजण आयोजित करतात.

नवरात्र उत्सवाची सांगता विजयादशमीच्या दिवशी दसऱ्याला होते. आश्विन शुद्ध दशमीला विजयादशमी असे म्हणतात. चामुंडा देवीने महिषासुराशी युद्ध करून दसऱ्याच्या दिवशी त्याचा वध केला अशी कथा आहे. तसेच दसऱ्याला श्रीरामांनी रावणाचा वध केला अशी देखील पौराणिक कथा असल्याने हा दिवस साजरा करतात. अनेक ठिकाणी रावण दहनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. दसऱ्याच्या दिवशी काही ठिकाणी देवीला मंदिराच्या बाहेर काढून छान मिरवणूक काढतात. या दिवशी सीमोल्लंघन, शमीपूजन, अपराजिता पूजा व शस्त्रपूजा करतात. दसरा हा सण विजयाचे प्रतीक असल्याने यादिवशी शुभकार्य करतात व आपट्यांची पाने सोन्याचे प्रतीक म्हणून एकमेकांना देतात.

कुमारिका पूजनासारख्या प्रथा अर्थपूर्ण आहेत, प्रत्येक ठिकाणी शक्तीचा अंश असतो. कुमारिकेमध्ये अमर्याद स्वरूपात निर्माण शक्ती भरून राहिलेली असते. अशा कृतज्ञतेतून तिचे पूजन होते. ङ्मयत्र नार्यस्तु पूज्य ते रमन्ते तत्र देवता:फ अशा विश्वासातून हे पूजन व्हावे असा गाभा आहे. अर्थात, स्त्रीची उपेक्षा, अवहेलना, अत्याचार हे राक्षसी कृत्य ठरते हा विचार रुजविण्याचा प्रयत्न आहे. चराचरांत भरून असलेल्या शक्तीचा महोत्सव म्हणजे नवरात्र! मातृत्वाचा गौरव म्हणजे नवरात्र! अनंत, अपार, अगाध प्रकृतीचे गुणगान म्हणजे नवरात्र! आजपासून सुरू होणाऱ्या शारदीय नवरात्राचा उद्देशच मुळी त्या महामायेसमोर कृतज्ञ भावनेने नतमस्तक होऊन शक्ती जागरण संचारण घडावे हा असतो. शक्ती उत्सवाची प्रथम वंदना चिद् शक्ती आदिमाया विश्वजननी, जगतस्वामिनीला!

# भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर उपाययोजना




| चिपळूण | प्रतिनिधी |

चिपळूण शहरातील भटक्या कुत्र्यांच्या समस्येमुळे नागरिक प्रचंड भयभीत झाले आहेत. त्यावर उपाययोजना करण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत, रस्त्यांवर टाकण्यात येणारे चिकन, मटण, मच्छीसह चायनीज व टाकाऊ पदार्थांचा विषय नागरिकांनी उजेडात आणत कारवाईची जोरदार मागणी केली होती. त्याची चिपळूण नगरपालिका प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. टाकाऊ अवशेष, उरलेले जेवण उघड्यावर टाकू नये, अशी सक्त ताकीद शहरातील चिकन, मटण, मासळी विक्रेते, चायनीज सेंटर्स तसेच हॉटेल व्यावसायिकांना नोटिसीव्दारे देण्यात येणार आहे. नियम मोडल्यास थेट दंडात्मक कारवाई करण्याचा इशाराही देण्यात येणार आहे.

**मांस, मच्छीचे टाकाऊ अवशेष उघड्यावर टाकू नका, नोटिसीव्दारे नगरपालिकेची व्यावसायिकांना ताकीद**

शहरात दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या भटक्या श्वानांची संख्या, त्यांच्याकडून बालके, वयोवृध्दांसह नागरिकांवर होणारे हल्ले यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. सध्या या प्रश्नावरून नागरिक आणि प्राणीप्रेमी यांच्यात संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली आहे. नुकत्याच झालेल्या विशेष बैठकीत प्राणीमित्र कार्यकर्त्यांनी भटक्या कुत्र्यांवर अन्याय होऊ नये, त्यांचे संरक्षण व्हावे अशी ठाम भूमिका मांडली. तर दुसरीकडे अनेक नागरिकांनी कुत्र्यांमुळे जीव धोक्यात येत असल्याचे सांगून त्यांचा बंदोबस्त केल्याशिवाय पर्याय नाही, असा पवित्रा घेतला. या विरोधाभासी भूमिकेमुळे वातावरण तापले आहे. या बैठकीत रस्त्यावर तसेच विविध भागात उघड्यावर फेकण्यात येणारे टाकाऊ पदार्थ, मांस, मच्छीचे अवशेष या विषयावरूनही अनेकांनी आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या होत्या. यामुळे या प्रकारांना आळा बसविण्यासाठी नगरपालिका प्रशासनाने प्रयत्न सुरू केले आहेत.

**सोमवारपासून अंमलबजावणी**

**मुख्याधिकारी विशाल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासकीय अधिकारी मंगेश पेढांबकर, कार्यालयीन अधिक्षक रोहित खाडे, आरोग्य विभाग प्रमुख वैभव निवाते, आरोग्य निरीक्षक सुजीत जाधव यांनी संबंधित व्यावसायिकांना सूचना देण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवारपासून या नोटीस त्यांना बजावण्यात येणार आहेत.**

## मोफत आरोग्य शिबीर

| कोर्लई | प्रतिनिधी |

अदानी फाऊंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड यांच्या वतीने शिस्ते येथील आगरी समाज हॉलमध्ये प्रथमच मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये मुंबई येथील नामांकित तज्ज्ञ डॉ. वैभव पाटील (जनरल फिजिशियन), डॉ. दिशा गोपाळकृष्ण (स्त्रीरोगतज्ज्ञ), डॉ. सुयश विरकर (त्वचारोग तज्ज्ञ) यांनी ग्रामस्थांची तपासणी करून योग्य उपचार सेवा व मार्गदर्शन दिले. तसेच वृद्ध रुग्णांच्या सांधेदुखी व गुडघेदुखीसारख्या आजारांवरही मोफत उपचार करण्यात आले. हेल्पएज इंडिया यांच्या माध्यमातून रक्तदाब, हिमोग्लोबिन व मधुमेह तपासणी तसेच फिरता दवाखाना सेवा उपलब्ध करून देण्यात आली. या शिबिरात एकूण २६३ ग्रामस्थांनी लाभ घेतला. दिघी पोर्टच्या माध्यमातून गावकऱ्यांसाठी विविध आरोग्यविषयक सोयी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. याचा जास्तीतजास्त फायदा घ्यावा व आपल्या आरोग्य समस्या दूर कराव्यात, असे अवधूत पाटील यांनी सांगितले. तर माणगाव येथील नितीन चांदोरकर व त्यांच्या टीमकडून औषधोपचाराची सुविधा देण्यात आली.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२२ सप्टेंबर**

१) श्रीम.प्रगती चिंतामण वर्तक वेश्वी, अलिबाग २१-९-१९४३
२) श्री.मनोहर कृष्ण भगत समर्थनगर, अलिबाग, २१-०९-१९४९
३) श्री.विलास हरिभाऊ गंभीर अलिबाग, २१-०९-१९५१
४)श्री.श्रीकृष्ण भिमाजी थळे गोंधळपाडा, अलिबाग दि.२१-०९-१९४९
५)श्रीम.सुप्रिया सुरेश पाटोळे वरसोली, अलिबाग दि.२१-०९-१९५१
६)श्री.राजन बाळकृष्ण नाईक मु.वरसोली, अलिबाग दि.२१-०९-१९५४

**सुवर्णकण**

तत्वज्ञानाच्या व्यासंगी लोकांनाजर ज्ञान नाही तर ते मिळवायचे कसे? हा जटील प्रश्न डोळ्यापुढे उभा राहतोखर विचारांची दिशाच चुकीची आहे भ्रांत आहे म्हणून आपण गोंधळलेल्या स्थितीत असतोबाहेरून शिकून ज्ञान मिळवायची गोष्टच नाहीआतूनच उत्स्फूर्त होते ज्ञानयासाठी हृदयाची शुद्धता असायला हवी त्यासाठी साधनांचा खटाटोप

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

## बिबट्याचा हल्ला

**चिपळूण :** कळंबट गावातील तुषार शिरकर हे मार्गताम्हाणे येथून मोटारसायकलने घरी परत होते. यावेळी त्याचा मुलगा मोटारसायकवर मागे बसला होता. कळंबट बौद्धवाडी येथे आले असता अचानक बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. यात सुदैवाने मुलगा थेडक्यात वाचला. मात्र, बिबट्याची नखे लागल्याने त्याला वहाळ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## ‘स्वच्छता ही सेवा’ कार्यक्रम उत्साहात



| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |

शेठ जे. एन. पालीवाला महाविद्यालय, पाली-सुधागड येथे राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या माध्यमातून ‘स्वच्छता ही सेवा’ या कार्यक्रमाअंतर्गत महाविद्यालय परिसर स्वच्छ करण्यात आला.

जागतिक स्वच्छता दिनाचे औचित्य साधून शनिवारी (दि.२०) महाविद्यालय परिसर स्वच्छता करण्यात आला. या स्वच्छता कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शाखांचे विद्यार्थी उपस्थित होते. स्वच्छता कार्यक्रमानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. सुधाकर लहुपाचांग यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच सर्व उपस्थित विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली.

## नवरात्रौत्सवात होणार कमळ फुलांची विक्री

### अदिवासींच्या रोजगाराचा प्रश्न मार्गी



| पाताळगंगा | प्रतिनिधी |

दुर्गामातेला कमळपुष्प वाहण्याची प्रथा आहे. त्यामुळे नवरात्रोत्सवात देवीच्या पुजेकरीता भक्तांकडून कमळ खरेदी केली जाते. बाजारपेठेत यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असून कमळ विक्रीतून आदिवासींचा रोजगारांचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

कमळ हे भारताचे राष्ट्रीय फुल आहे. तसेच ते बहुगुणी असल्याचे आयुर्वेदानेही स्पष्ट केले आहे. दुर्गामातेला कमळ फुल वाहण्याची प्रथा असल्याने नवरात्रोत्सवात भक्तांकडून ते वाहण्याला प्राधान्य दिले जाते. तालुक्यातील विविध गावांमधील तलावात उमललेल्या कमळाचे दृश्य पाहून मन मोहून जाते. कमळाच्या लाल व उपल्या दोन जाती आढळतात. पाने गुळगुळीत, खाली लवदार असून देठ लाल नारंगी रंगाचा असतो. ही कमळ सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात उमलतात. उपल्या कमळाची पान वर्तुळाकार असून पानाच्या खालच्या बाजूस ठिपके असतात. जांभळी, फिकट, निळी, पांढरी, गुलाबी इ. विविधरंगी फुलांना मंद सुवास असतो. तलावातून कमळांची फुल गोळा करून रेल्वे स्थानक, मुख्य रस्ता, सार्वजनिक स्थळी मोठ्या प्रमाणात विक्री होते. त्यामुळे कमल विक्रीतून आदिवासींचा रोजगाराचाही प्रश्न मार्गी लागणार आहे.



## ‘अष्टविनायक पतसंस्था तत्पर सेवा देणार’

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठण्यातील आराधना भवन येथे शनिवारी (दि.२०) सायंकाळी श्री अष्टविनायक सहकारी पतसंस्थेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष विलास चौलकर यांनी अष्टविनायक पतसंस्था भविष्यातही चांगली व तत्पर सेवा देणार, असे अभिवचन दिले. तसेच यावेळी पतसंस्थेतील सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

विलास चौलकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, कोविड काळात सर्व ठप्प झालेले असतांनाच अष्टविनायक पतसंस्थेने ग्राहकांना अखंडित सेवा दिली. सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार व संचालक मंडळ यांच्या सहकार्यामुळेच केवळ चार कर्मचाऱ्यांवर ही संस्था चालवताना १५ कोटींच्या वर उलाढाल करून गेल्या वर्षाच्या तुलनेत दुप्पट नफा मिळवून ऑडिट अ वर्ग मिळविला आहे. संस्थेचे वसुली पथकही चांगले काम करीत आहे. मंदीच्या काळात इतर पतसंस्थांनी कर्ज देणे थांबविल. मात्र, आपल्या संस्थेने त्यावेळी अनेकांना कर्ज देऊन उभे करण्यास मदत केली.

विना सहकार, नाही उद्धार आणि एकीचे बळ, मिळते फळ या तत्वाने चालल्यानेच हे यश मिळाले आहे. त्यामुळेच भविष्यातही अशीच चांगली व तत्पर सेवा देत राहू, असे अभिवचन दिले. याचवेळी त्यांनी आमची कुणाशीही स्पर्धा नाही, असे स्पष्ट करून सभासदांना १० टक्के लाभांशही जाहीर केला.

तसेच, पतसंस्थेच्या वार्षिक सभेचे औचित्य साधून गुणवंत विद्यार्थी व उल्लेखनीय कार्य केलेल्या सपोनि सचिन कुलकर्णी, पोलिस शिपाई स्वप्नील भालेराव, सखाराम ताडकर, प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे, सुजाता नांदगावकर, चार्टर्ड अकाउंटंट ओमकार शिर्के, ॲड. किरण जाधव यांच्यासह अनेक व्यक्तींचा सत्कार यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

## ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ अभियान



| म्हसळा | प्रतिनिधी |

ग्रामीण रुग्णालय म्हसळा येथे स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान आणि दिव्यांग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानांतर्गत संपूर्ण देशभर महिला आरोग्य तपासणी, उपचार सेवा आणि पोषण आयोजित शिबीरांतून महिलांची निरोगी जिवनशैली, गरोदर आणि स्तनदा मातांसाठी टेक-होम-राशन () चे वितरण, या संकल्पनेतून स्वस्थनारी सशक्त परिवार योजना सुरु झाल्याचे डॉ. निशिकांत पाटील जिल्हा शल्यचिकित्सक यानी सांगितले.

यावेळी डॉ. किरण शिंदे, आरएमओ, रायगड, म्हसळा नगरपंचायतीच्या नगरसेविका राखी करंबे यानी म्हसळा ग्रामिण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रफुल्ल पावसेकर, डॉ.शिवम आणि कर्मचारी वर्ग रुग्ण सेवा आत्मीयतेने करतात. म्हसळ्यासारख्या दुर्गम गावासाठी टेलीमेडीसीन सल्ला केंद्र आशा बहुविध सुविधा आरोग्य विभाग पुरविते, असे यावेळी आभिमानाने सांगत कर्मचारी वर्गाचे कौतुक केले.

यावेळी स्त्री रोग १५, भिषक १२, नेत्ररोग १७, अस्थिव्यंग १३, जनरल २६, दंत ४, मानसिक रुग्ण ४, बालरुग्ण ९, तर दिव्यांगामध्ये अस्थिव्यंग ३२, नेत्र ४, मानसिक ११ भिषक २३ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

## चिरनेरच्या कोहिनूर गायकांचा होणार सन्मान

**उरण :** नवरात्रउत्सवाचे औचित्य साधून, अभिनव सामाजिक सांस्कृतिक कला क्रीडा मंडळ चिरनेर प्रणित सार्वजनिक नवरात्र मंडळाच्या वतीने चिरनेरच्या सात कोहिनूर गायकांचा महासन्मान करण्यात येणार आहे. हा सन्मान दुर्गा मातेच्या उत्सवाच्या पाचव्या माळेवर रात्री नऊ वाजता होणार आहे. यामध्ये गायन कार्यक्षेत्रातील गायक मोहन फुंडेकर, विवेक केणी, समाधान फोफेरकर, विशाल पाटील, सुरज पाटील, आकाश गोंधळी, अविनाश नारंगीकर या नामवंत गायकांचा मान्यवरांच्या हस्ते महासन्मान करण्यात येणार आहे.

## आरोग्य शिबिराचे आयोजन

| गुहागर | प्रतिनिधी |

शासनाच्या स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान अंतर्गत गुहागर ग्रामीण रुग्णालयात आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबीर गुरुवारी दिनांक २५ सप्टेंबर रोजी होणार आहे. या शिबिरामध्ये स्त्री रोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, नेत्र तज्ज्ञ, नाक, कान, घसा तज्ज्ञ, त्वचारोग तज्ज्ञ, मानसोपचार उपचार तज्ज्ञ, फिजिशियन, सर्जन, अस्थिरोग तज्ज्ञ, दंतचिकित्सक, आयुष तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत. गरोदर स्त्रियांची मोफत सोनोग्राफीही करण्यात येणार आहे.

## भात पिकावर निळ्या भुंगेऱ्याचा प्रादुर्भाव

| चिपळूण | प्रतिनिधी |

तालुक्यातील काही ओढे व नदी-नाल्यांच्या काठावरील तसेच पाणी साचणाऱ्या ठिकाणी असणाऱ्या भातशेतीत निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. त्यामुळे पिकाचे नुकसान होण्याची संभावना नाकारता येत नाही. ही कीड गर्द निळ्या रंगाची असून तिची अळी भुरकट पांढऱ्या रंगाची असते. अळी अवस्था व प्रौढ अवस्था या दोन्ही हानिकारक आहेत. ही कीड पानाचा हिरवा भाग खरवडून खाते, परिणामी पानांवर पांढरे डाग दिसतात.

**कीड नियंत्रणासाठी उपाययोजना**

**भात लावणीनंतर बांध स्वच्छ ठेवावेत. सतत प्रादुर्भाव असलेल्या पाणथळ भागात कापणीनंतर शेताची नांगरट करून धस्कटे काढून टाकावीत. जमिनीत पाणी जास्त काळ साचणार नाही, यासाठी योग्य निचऱ्याची व्यवस्था करावी. रासायनिक कीटकनाशक फवारणी करावी. वेळेत योग्य उपाययोजना करून किडीचा प्रसार आटोक्यात आणावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.**

प्रादुर्भाव जास्त झाल्यास भात पिकाची वाढ खुंटते. या किडीचा प्रसार विशेषतः पाणथळ जमिनीत तसेच नत्र खताचा अवाजवी वापर झाल्यास अधिक प्रमाणात होतो. भात कापणीनंतर ही कीड बांधावरील गवतावर व भाताच्या फुटव्यांवर उपजीविका करते आणि पुढील हंगामात भात पिकास उपद्रव देते.

**सुमारे पाच टन घनकचरा गोळा | विद्यार्थ्यांसह नागरिकांचा सहभाग**

# श्रीवर्धन नगरपरिषदेमार्फत स्वच्छता अभियान

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

स्वच्छता ही सेवा २०२५ या पंधरवड्याचा भाग म्हणून, शनिवारी (दि.२०) आंतरराष्ट्रीय किनारी स्वच्छता दिवसाचे औचित्य साधून श्रीवर्धन नगरपरिषदेमार्फत समुद्रकिनाऱ्यांवर भव्य स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या अभियानात शासकीय अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स, शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. श्रीवर्धन नगरपरिषदेने ही मोहीम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी स्वयंसेवकांना हँड ग्लोव्हस, गार्बेज बॅग्स आणि ट्रॅक्टर इत्यादी सामग्रीची सोय केली. या मोहिमेचा मुख्य उद्देश सागरी पर्यावरणाचे रक्षण करणे आणि समुद्रकिनाऱ्यांवरील प्लास्टिक व इतर कचरा हटवून किनारे स्वच्छ ठेवण्याबद्दल समाजामध्ये जागरूकता निर्माण करणे हा होता.



अभियानादरम्यान, शहरातील प्रमुख रस्त्यांवरून विद्यार्थ्यांसह नागरिकांनी मोठ्या उत्साहात स्वच्छता दौड काढली. माझे शहर, माझी जबाबदारी, प्लास्टिक मुक्तीचे व्रत पाळू या, अशा घोषणांनी वातावरण भारावून गेले. या दौडीद्वारे नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. त्यानंतर स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. स्वच्छ श्रीवर्धन, सुंदर श्रीवर्धन, या संकल्पनेला दृढ वचन देत नागरिकांनी स्वच्छता आपल्या दैनंदिन जिवनाचा भाग बनवण्याची प्रतिज्ञा केली.

सहभागींनी समुद्रकिनाऱ्यांवरून प्लास्टिक बाटल्या, पॉलिथिन, काचेचे तुकडे आणि इतर घनकचरा गोळा करण्यात आला. या मोहिमेत तब्बल ५ टन इतका घनकचरा गोळा करण्यात आला. अशा उपक्रमामुळे समुद्रकिनाऱ्यांचे सौंदर्य टिकवण्यात हातभार लागेल आणि त्याचबरोबर सागरी जीवांना होणारा धोकाही रोखता येईल. या वेळी, स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी आणि भविष्यात किनारी भागांचे संवर्धन करण्यासाठी नगरपरिषदमार्फत पथनाट्ये आणि जनजागृतीसारख्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या अभियानामुळे स्वच्छ भारत अभियानाप्रती असलेली सामूहिक जबाबदारी अधोरेखित झाली आहे. यापुढेही असे उपक्रम नियमितपणे श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाद्वारे राबवले जातील. स्वच्छ आणि सुंदर किनारे राखण्यासाठी नागरिकांनी नेहमी सहकार्य करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

> “स्वच्छ व सुंदर समुद्र किनारा कसा असावा याचे उदाहरण म्हणजे श्रीवर्धन किनारा! पर्यटनदृष्ट्या अनन्यसाधारण महत्व प्राप्त असलेल्या श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याला यंदा ब्लू फ्लैग बीच या आंतरराष्ट्रीय नामांकन मिळवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न चालू आहेत.”
> – विराज लबडे, मुख्याधिकारी तथा प्रशासक, श्रीवर्धन नगरपरिषद

**निवडक**



## मुरुडमध्ये सेवा पंधरवडा अभियान

**कोर्लई :** शासनाचा सेवा पंधरवडा कार्यक्रम म्हणजे विकासाचे शिखर गाठण्याची सुवर्णसंधी आहे. सर्वांनी या मोहिमेत सहभागी होऊन एकजुटीचे सूत्र अंमलात आणावे. गावाच्या विकासासाठी हे अभियान मार्गदर्शक ठरणार असल्याचे प्रतिपादन तहसीलदार आदेश डफळ यांनी नांदगावमध्ये सेवा पंधरवडा कार्यक्रमाप्रसंगी केले. मुरुड तालुक्यात दि. १७ सप्टेंबर रोजी तालुक्यातील २४ ग्रामपंचायतीत ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण व दुर्गा देवरे यांच्या उपस्थितीत तहसीलदार आदेश डफळ यांनी सेवा पंधरवडा अंतर्गत पहिल्या टप्प्यातील पाणंद रस्ते मोहिमेअंतर्गत माहिती नांदगाव येथील ग्रामसभेत दिली. नांदगाव येथे ग्रामस्थ, शेतकरी बांधवांसमवेत शिवारफेरी काढण्यात आली होती. शासनाने सेवा पंधरवड्यात ठरवून दिलेल्या तीन टप्प्यांची पाणंद रस्ते, सर्वांसाठी घरे व इतर नाविन्यपूर्ण उपक्रमांची सविस्तर माहिती यावेळी देण्यात आली.

## ओझर्डे बंधूंकडून विन्हेरेच्या झोलाई देवीला सोन्याचा मुकुट

**महाड :** महाड शहरातील ऐतिहासिक असणाऱ्या वीरेश्वर महाराजांची बहीण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व ८४ गावची मालकीण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विन्हेरे गावातील नवसाला पावणाऱ्या झोलाई देवीला सोनेरी मुकुट अर्पण करण्यात येणार आहे. शिरगाव गावचे सरपंच सोमनाथ दिगंबर ओझर्डे यांच्याकडून हा मुकुट अर्पण करण्यात येणार असून हा भव्य दिव्य कार्यक्रम २२ सप्टेंबर दुपारी तीन वाजता देवीच्या मंदिरात मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा होणार आहे. या कार्यक्रमासाठी मुंबई पुण्यासहित झोलाई देवीचे हजारो भक्त उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे विन्हेरे पंचक्रोशीतील गावात आनंदाचे वातावरण पसरले आहे.





## एच. एन. पाटील यांना पुरस्कार

**उरण :** रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेचे उपशिक्षक एच. एन. पाटील यांचा लायन्स क्लब ऑफ उरणच्या वतीने उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने सन्मान करण्यात आले. हा सोहळा उरण नगर परिषद शाळेत पार पडला. यावेळी उरण तालुक्यातून एकूण १५ शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. एच. एन. पाटील हे रयत शिक्षण संस्थेत गेली २६ वर्षे उपशिक्षक म्हणून काम करत आहेत. २५ वर्ष ते विविध शाखेत विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख म्हणून काम करत आहेत. ३५ वर्ष क्रिकेट समालोचन, ३० वर्ष निवेदक, तसेच गायन, वादन, लेखन, तज्ज्ञ हिंदी शिक्षक, परीक्षक तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रमात ते सक्रिय सहभाग घेऊन काम करत असतात. त्यांना सन २००५ साली सह्याद्री कला संघ डोळखांबच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार, सन २०१२ साली राजश्री शाहू महाराज राज्यस्तरीय पुरस्कार, सन २०१९ मध्ये रयत शिक्षण संस्था सातारा कडून कार्यक्षम आदर्श गुरुकुल शिक्षक पुरस्कार. तसेच विविध संस्थेच्या माध्यमातून त्यांचा गुणगौरव करण्यात आलेला आहे. एक विद्यार्थी प्रिय शिक्षक, हिंदी तज्ज्ञ शिक्षक, उत्कृष्ट निवेदक म्हणून ते रयत शिक्षण संस्थेत काम करत आहेत.

## कोमसापच्या विश्वस्तपदी एल.बी.पाटील



**उरण :** कोकणातील कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप) ही सुप्रसिद्ध साहित्य परिषद आहे. या परिषदेच्या सन्मानाच्या विश्वस्तपदी कोकणातील साहित्यरत्न रायगडभूषण तसेच उरण तालुक्याचे सुपुत्र प्रा.एल.बी.पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते कोमसापच्या स्थापनेपासून संघटनेत विविध पदांवर कार्यरत राहिलेले आहेत. २१ वर्षे शाखाध्यक्ष, १८ वर्षे जिल्हाध्यक्ष, ३ वर्षे कार्याध्यक्षपद त्यानंतर विद्यमान जनसंपर्क प्रमुख म्हणून सेवा केली आहे. सेवा काळात कोकणातील साहित्यिकांचे आवडते व्यक्तिमत्त्व राहिलेले आहेत. कोमसापच्या सन्मानपदी त्यांची पद्मभूषण मधु मंगेश कर्णिक, कोमसाप कार्यकारिणी, आणि कोमसाप जनरल सभेतर्फे त्यांची नियुक्ती करण्यात आल्याने उपस्थितांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. हा कार्यक्रम कुडाळ (सिंधुदुर्ग) येथे कोमसाप अध्यक्ष नमिता कीर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

## कोलाड आंबेवाडी नाक्यावर वाहतूक कोंडी

**सुतारवाडी :** कोलाड आंबेवाडी नाक्यावर अत्यंत रहदारीच्या मध्यवर्ती रस्त्याच्या दुतर्फा लहान मोठ्या वाहनांची रांगचरांग लागून वाहतूक कोंडी होत असते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला किरकोळ भाजीपाला विक्री करणारे बसलेले असतात. भाजी खरेदी करण्यासाठी काही चारचाकीवाले त्याच ठिकाणी वाहने थांबवून भाजी खरेदी करतात. त्यामुळे काही वेळा वाहतुकीची कोंडी होत असते. त्याचप्रमाणे रहदारीच्या ठिकाणी जागोजागी खड्डे पडलेले असल्यामुळे येणारी जाणारी वाहतूक मंदगतीने होत असते. सर्वपित्री अमावस्येच्या एक दिवस अगोदरच या ठिकाणी भाजी खरेदी करणाऱ्यांची संख्या मोठी होती. त्यामुळे काही काळ वाहतुकीची कोंडी झाली होती. खरेदी करणाऱ्याने आपले वाहन शिस्तीमध्ये बाजूला लावले तर वाहतूक कोंडी होणार नाही.



## नि|व|ड|क



### मुरूड बाजारपेठेत वाहतुकीचा खोळंबा

**आगरदांडा :** मुरूड शहरातील मुख्य बाजारपेठेतील वळणाच्या रस्त्यावर दुतर्फा मोठ्या संख्येने दुचाकी उभ्या करुन ठेवण्यात येत आहेत. परिणामी, एसटी तसेच मोठी वाहने येथून बाहेर पडताना मोठी कसरत करावी लागते. कधी कधी मोटारसायकल व एसटी चालक शाब्दिक चकमक होत आहे. परिणामी, वाहतुकीचा कायम खोळंबा होत आहे. वाहतूक नियंत्रणाकरिता ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे. जसे गणेशोत्सवावेळी वाहतुकीसंदर्भात नियम केले जातात. ते नियम कायमस्वरूपी करावे जेणेकरून शहरातील पादचाऱ्यांना वाहतुकीचा त्रास होणार नाही, अशी मागणी मुरुडकरांकडून करण्यात येत आहे.



### रस्त्यावरील गवत त्रासदायक

**पेण :** तालुक्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वरील धाऊळपाडा गावाजवळ असलेल्या नदीवर बांधण्यात आलेल्या पुलावरील नागोठणे बाजूकडून वडखळ बाजूकडे पादचारीसाठी येण्या-जाण्यासाठी पादचारी रस्ता बनविण्यात आला आहे. परंतु, त्या पादचारी पुलावर ठेकेदार कंपनीने माती-खडीमिश्रित कचरा टाकल्यामुळे गवत वाढले आहे. त्यामुळे पुलावरून प्रवास करताना त्रासदायक ठरत आहे. तरी संबंधित प्रशासनाने व रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीने याकडे लक्ष देऊन हा वाढलेले गवत आणि कचरा काढून रस्ता मोकळा करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ व प्रवाशांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



### दिव्य गर्भसंस्कार कार्यक्रम सादर

**नवीन पनवेल :** प्रसिद्ध स्त्रीरोग व गर्भ संस्कार तज्ज्ञ डॉ. शुभदा नील यांनी ब्रह्मा कुमारीज द्वारा माऊंट आबू येथे आयोजित राष्ट्रीय माईंड बॉडी मेडिसीन परिषदेत आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांना दिव्य गर्भसंस्कार कार्यक्रमाची माहिती दिली. डॉ. शुभदा नील यांनी संपूर्ण देशभरातून आलेल्या डॉक्टरांसमोर हा कार्यक्रम विस्ताराने सादर केला. या कार्यक्रमाद्वारे गर्भवती महिलांना आहार, व्यायाम, प्राणायाम, मेडिटेशन, नॉर्मल डिलिव्हरी व इतर विषयांवर मार्गदर्शन केले जाते. गर्भसंस्कारामुळे बाळ सुसंस्कारी, ज्ञानवान, सर्व गुणांनी संपन्न, शक्तीशाली, चरित्रवान, बुद्धिवान होण्यास मदत होते. गर्भवती माता खुश आणि स्वस्थ राहिल्या तर येणारे बाळ खुश व स्वस्थ होते, असे प्रतिपादन डॉ. शुभदा नील यांनी केले.

### डॉ.अनुपमा धनावडे यांचे निधन

**रायगड :** रायगड जिल्ह्यातील हिंदी विषयातील पहिल्या



पीएच.डी. डॉ. अनुपमा दिलीप धनावडे, रा. पेण यांना नुकतीच देवाज्ञा झाली. निधनसमयी त्या ६६ वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाने सर्व स्तरातून हळहळ व्यक्त होत आहे. 'साठोत्तरी नाटकों मे नारी चित्रण' हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर संचालित डॉ. पतंगराव कदम आर्ट्स आणि कॉमर्स कॉलेज, पेण येथे त्यांनी प्राचार्या म्हणून अनेक वर्षे कारभार पाहिला. त्यांच्या पश्चात पती दिलीप धनावडे निवृत्त जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, मुलगी दीप्ती आणि मुलगा वैभव धनावडे असा परिवार आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहेत. १) नर्स ANM/GNM २) नर्स Private Nursing Course. ३) मुले/मुली १२ वी पास. ४) X-Ray साठी मुले, ५) मावशी/आयाबाई, ६) रिसेप्शनिस्ट. आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र आणावे. अंजली हॉस्पिटल अलिबाग, ७७४५०५००२५, ९१११९५६५०२२, ९३२१३०३९३८
- पाहिजेत : अलिबागमधील नामांकित ऑफिसकरीता पदवीधर मुलगा/मुलगी भरणे आहे. संपर्क : ९९२३७५०५४९, ९४२२३८३०९९
- वरसोली मोक्याची जागी चालू आईस्क्रिम पार्लर आणि केकचे दुकान योग्य भाड्याने देणे आहे. संपर्क :९४२३३७७४२२
- कन्स्ट्रक्शन ऑफीस कामाकरिता अनुभवी अकाऊंटंट महिला/मुलगी पाहिजे. अनुभव २ ते ३ वर्षे शैक्षणिक पात्रता बी.कॉम, टायपिंग व बेसीक कॉम्प्युटर पगार रु. १००००/- ते १२०००/- संपर्क- मु. नांदाईपाडा, पो. झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड, मोबाईल नं. ८९८३०९३३५३.
- अलिबागमधील आर्किटेक्ट ऑफिसकरीता ऑटोकेड ड्राफ्टसमन ३d डेवलपर, इंटीरियर डिझाइनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- श्री सिद्धीविनायकज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरीधंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण, अलिबाग फोन नं. ९९६०४५६९८६
- कामासाठी माणसे पाहिजेत. अलिबाग परिसरातील गरजुनी भेटावे. ३ ते ६मध्ये १) बाईकने डिलेवरी (लाइसन बंधनकारक) २) बँक ऑफिसमध्ये (कॅम्प्युटर नॉलेज) ३) सेल्समॅन ४) पार्ट टाईम/फुलटाईम. संपर्क- ८८८८२२०२२१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# एकसंघ राहून पत्रकारिता करणार

**सुरक्षा आणि सामाजिक प्रश्नांसाठी पत्रकारांचा निर्धार**



**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यात झालेल्या बोगस पत्रकारांचा सुळसुळाट आणि शासकीय, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात पत्रकारिता क्षेत्राबाबत झालेले चुकीचे गैरसमज, यावर उपाययोजना करण्याची इच्छा पनवेल तालुक्यातील अनेक ज्येष्ठ पत्रकारांसह नवोदित पत्रकारांनी व्यक्त केली. त्यानुसार पनवेल तालुक्यातील पत्रकारांनाएकसंघकरण्याच्यादृष्टिकोनातून तालुक्यातील सर्वच पत्रकारांचे एकत्र विचार व उपाययोजना करण्यासाठी तसेच आपल्या सूचना मांडण्यासाठी शुक्रवार, दि. १९ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता शासकीय विश्रामगृह, पनवेल येथे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात पनवेल तालुक्यातील सर्व पत्रकारांनी आवर्जून उपस्थित दाखवून तालुक्यातील ५० हून अधिक पत्रकार हे एका छताखाली जमले आणि एक तालुका एकसंघ करण्याच्या दृष्टीने विचारविनिमय करण्यात आला.

### चर्चासत्रातून जनजागृती

**बोगस पत्रकारांमुळे समाजात तसेच शासकिय यंत्रणेमध्ये वेगवेगळे गैरसमज निर्माण झाले आहेत. चर्चासत्रातून पत्रकारांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न शुक्रवारी करण्यात आला. पत्रकार हल्ला या विषयावर वेगवेगळ्या ज्येष्ठ पत्रकारांनी मार्गदर्शन केले. एका छताखाली येऊन प्रश्नांची सोडवणूक करण्याचा निर्धार केला.**

### दि.बा. पाटील यांचे नाव द्या

**प्रकल्पग्रस्त, शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लोकनेते दि. बा. पाटील यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. त्यामुळे नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी वाढत आहे. पनवेलच्या पत्रकारांनी देखील त्यासाठी पुढाकार घेतला. पाठपुरावा करण्याचा निर्णय चर्चा सत्रामध्ये घेण्यात आला.**

चर्चासत्राच्या सुरुवातीलाच दिवंगत पत्रकार किरण बाथम यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच साम टीव्हीचे पत्रकार विकास मिरगणे यांच्यावर मुंबई येथे पोलीस खात्याकडून झालेल्या हल्ल्याचा निषेध करण्यात आला. या चर्चासत्रात ज्येष्ठ पत्रकार माधवराव पाटील, विजय कडू, निलेश सोनावणे, संजय कदम, सय्यद अकबर, विवेक पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी सर्वानुमते असे ठरले की, पुढील काही महिने सर्वांनी आपापल्या संघटना बाजूला ठेवून एकत्रित पणे काम करू. याचबरोबर पनवेलबाहेरील पत्रकार पनवेलमध्ये येऊन राजकीय पुढारी आणि शासकीय अधिकाऱ्यांना ब्लॅक मेलिंग करून जी अनधिकृत वसुली करीत त्यांना आवर घालण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ठरवले आहे. याचवेळी ज्येष्ठ आणि नवोदित पत्रकारांची कोअर कमिटी बनवण्यात आली. या कमिटीमध्ये कोणीही अध्यक्ष किंवा सचिव नसणार आहे.

यावेळी लोकनेते दि.बा. पाटील साहेबांचे नाव नवी मुंबई विमानतळाला देण्याबाबत केंद्रीय हवाई उड्डाण मंत्री मुरलीधर मोहोळ तसेच खा. श्रीरंग बारणे यांच्याशी पत्रव्यवहार करून पाठपुरावा करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. आज सुरु असलेल्या पत्रकारितेबाबत पत्रकारांनी चर्चा केली तसेच लवकरच पनवेलचे पत्रकार एका छताखाली यावेत यासाठी एक नवीन नोंदणीकृत संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# नवरात्रीला नवरूपे तू...

**चंडिका मातेच्या उत्सवास आजपासून प्रारंभ**

**| तळा | प्रतिनिधी |**



तळा शहराची ग्रामदेवता चंडिका मातेच्या उत्सवास उद्या सोमवार, दि. २२ सप्टेंबरपासून प्रारंभ होणार आहे. अश्विन शुद्ध प्रतिपदा ते नवमीपर्यंत नवरात्र उत्सव साजरा केला जातो. देवीच्या नवरात्रोत्सवात घटस्थापना, अखंड दीप, घटावर दीड माळा आणि कुमारिका पूजन हे महत्त्वाचे भाग असतात.

देवी घटी बसविण्यासाठी विविध वतनदारांना कामे वाटून दिलेली असतात. त्यामध्ये कुंभार घट व माती आणतो. बुरुड परडी आणतो. वाणी घटाजवळ पेरा करण्यासाठी विविध प्रकारची धान्ये तसेच नऊ दिवस अखंड दीप लावण्यासाठी तेल आणतो. नाभिक आरसा आणतो.शिंपी खण आणतात. पोतदारांकडून रोज देवीला तिळाच्या फुलांची माळ बांधली जाते.यामध्ये पुर्ण माळ ही सवाशीणीची अन अर्धी माळ कुमारिकेची असते.प्रतिपदेला दुपारी बारा वाजता चंडिका देवी वतनदार उपाध्ये यांच्याकडून घटी बसविली जाते. शेतातील काळी माती आणून वेदिका तयार करतात.वाण्यांनी आणलेली ७ प्रकारची धान्ये पेरली जातात.नवरात्रात दरदिवशी देवीला नवीनसाडी,चोळीचेसुशोभनकेल्यावर मुखवटा, कंबरपट्टा, आशा विविध दागिन्यांनी सजविले जाते. देवीच्या दागिन्यांच्या देखभालीसाठी गुरव २४ तास मंदिरात हजर असतो. मांग वतनदार देवीची कवने गातो. सकाळी व संध्याकाळी देवीची आरती करण्यात येते. संध्याकाळच्या आरतीनंतर परिटवाड्यातील सुतार मंडळी पंचपदी म्हणतात.नवरात्रोत्सवात मंदिरात भजन व जागरण करण्यासाठी प्रत्येक वाडीस पुढील प्रमाणे तिथी नेमून दिलेली आहे. घटस्थापनेच्या दिवशी जोगवाडीकर, द्वितीयेला भोईरवाडी, तृतीयेला राणेचीवाडी गोळेआळी, चतुर्थीला मुंढ्याची वाडी, पंचमीला कुंभार वाडा, षष्ठीला फोंडल वाडी, सप्तमीला राणेची वाडी मंडलीक आळी व गवळी समाज तारणे, त्यानंतर वडाची वाडी पारधी आळी व रोहिदास समाज, दुर्गाअष्टमीला वडाची वाडी मोहिते आळी व आनंदवाडी, नवमीला परीट वाडी, शेवटी दसऱ्याच्या दिवशी पुसाटी वाडी या सर्व नेमून दिलेल्या वाड्यांवर देवीचा दहा दिवस भजन, जागरण व देवीच्या अंगावर घातलेल्या अलंकारांची राखण करण्याची जबाबदारी असते. अशा प्रकारे दहा दिवस देवीचा कार्यक्रम उत्साहात पार पाडला जातो.

# मुरुडकिनारी सागर स्वच्छता मोहीम




**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

जी. एम. वेदक विज्ञान महाविद्यालय, तळा आणि भारतीय राष्ट्रीय महासागर सूचना सेवा (इनकॉईस), भू-विज्ञान मंत्रालय भारत सरकार, हैदराबाद तसेच जयभवानी मच्छिमार सहकारी संस्था मुरुड याच्या संयुक्त विद्यमाने मुरुड समुद्र किनारी शनिवार (दि. २०) सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

भारतातील सर्व ठिकाणी स्वच्छ सागर सुरक्षित सागर या संकल्पनेद्वारे स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली. सर एस.ए. ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी तसेच मच्छिमार संघाचे पदाधिकारी व कोळी बांधवांनी विशेष सहभाग नोंदवला.

या स्वच्छता अभियानात प्रमुख पाहुणे म्हणून तटरक्षक दलाचे कमांडंट निशांत भरतद्वाज, बंदर निरीक्षक प्रमोद राऊळ, मुरुड नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर, सर एस. ए. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. बी.एस. मोरे, प्रा. आनंद तोंडले पाटील, दिघी अदानी पोर्टचे अधिकारी सत्यंद्रनाथ, मत्स्यव्यवाय विकास अधिकारी, वन विभागाचे अधिकारी, राज्य मच्छिमार संघाचे सदस्य मनोहर बैले, एकदरा संस्थेचे जगन वाघरे, जयभवानी मच्छिमार संस्थेचे अध्यक्ष प्रकाश सरपाटील, ललित मढवी, मनोहर गार्डी, ग्रामस्थ, विविध क्षेत्रातील नागरिक आणि मच्छिमार बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी होऊन राष्ट्रनिर्मितीसाठी सर्वांनी सहकार्य केले आहे. लोकांमध्ये सागर स्वच्छता विषयी जनजागृती निर्माण व्हावी यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी इनकॉईसचे प्रशासकीय अधिकारी संतोष कुमार, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्या डॉ. एस. एस. मिर्झा, प्रकाश सरपाटील, महेंद्र गार्डी, नरसिंह मानाजी, डॉ. बी.जी. भवरे आणि जी.एम. वेदक महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# विजेच्या लपंडावामुळे झोपमोड

**महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे नागरिक त्रस्त**

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील गावांमध्ये विजेचा लपंडाव सुरूच असून, त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. पहाटेच्या सुमारास वीज गायब होत असल्याने नागरिकांची झोपमोड होत आहे. त्यामुळे महावितरणचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा समोर आला.

नेरे, महालक्ष्मी नगर येथे होत असलेला सबस्टेशनचे काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे वीज गेली तर फॉल्ट शोधण्यात जास्त वेळ जातो. शुक्रवार आणि शनिवारी पहाटे वीज गायब झाली होती. तब्बल पाच ते सहा तासांनंतर वीज पूर्ववत करण्यात महावितरणला यश आले. ओएनजीसी येथे बिघाड झाल्याचे महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात आले. मात्र, त्याचा फटका वीज ग्राहकांना बसतो. वीज गेल्याने झोप पूर्ण होत नाही, तसेच मच्छरांचे प्रमाणदेखील वाढले आहे. महावितरणचे हे नित्याचे झाले आहे. नेरे परिसरात अनेक गावांचा समावेश आहे मात्र वारंवार वीज गायब होत असल्याने त्याचा फटका ग्राहकांना बसतो. अनेक व्यावसायिकदेखील या महावितरणच्या सेवेला वैतागले आहेत. वारंवार वीज गायब होत असल्याने फ्रीज बंद राहतो आणि दुग्धजन्य पदार्थ खराब होतात. मात्र, महावितरणला त्याचे सुयर-सुतकनाही. वीजकधी येईल याचा पत्ता नसतो. मात्र, अधिकाऱ्यांना फोन केला असता फोनदेखील उचलत नसल्याचे तक्रारीत वाढ होत आहे.



# बाहे शाळेत स्पर्धा उत्साहात

**| खांब | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाहे येथील प्रा. शाळा बाहे येथे चित्रकला व निबंध स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आली. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त चित्रकला व निबंध स्पर्धा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन उत्तमोत्तम चित्रे काढली, तसेच सुंदर हस्ताक्षरात निबंधाचे लेखन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी मुख्याध्यापिका हाके व उपशिक्षिका खरात यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर या उपक्रमामध्ये शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व पदाधिकारी व सदस्य त्याचप्रमाणे सर्व पालक यांचेही सहकार्य लाभले. स्पर्धेच्या आयोजनाबद्दल पालकांनी शिक्षकांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

# किनारा स्वच्छतेला शेकडो हात



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरूड वसंतराव नाईक कला आणि वाणिज्य महाविद्यालया मधील राष्ट्रीय सेवा योजना युनिट १० आणि जीवन दीर्घ शिक्षण आणि विस्तार विभाग, राष्ट्रीय किनारा संशोधन केंद्र व मुरुड-जंजिरा नगरपालिका परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या 'स्वच्छ सागर, सुरक्षित सागर' या जागतिक किनारपट्टी स्वच्छता मोहिमेत नागरिकांनी व शालेय विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, शेकडो हातांनी समुद्रकिनारा स्वच्छ केला.

यावेळी तहसीलदार आदेश डफळ, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, डॉ. सुभाष म्हात्रे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे, डॉ. श्रीशैल बहिरगुडे, गजानन मुनेश्वर, मनोहर बैले, नंदकुमार आंबेतकर, प्रमोद राऊळ, डॉ. नारायण बागुल, डॉ. सीमा नाहिद, राकेश पाटील, सतेज निमकर, सिटी को. सचिन कोरके, मनोहर मकु, विजय सुर्वे आदींसह विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

यावेळी डॉ. सुभाष म्हात्रे यांनी शपथीचे वाचन करून विद्यार्थी व मान्यवरांना स्वच्छतेची शपथ दिली. प्रा. डॉ. जनार्दन कांबळे म्हणाले की, नॅशनल सेंटर कोस्टल रीसर्च चेन्नई यांनी महाविद्यालयाला समुद्रकिनारा स्वच्छ करण्यासाठी संधी दिली आहे. महाविद्यालयात दहा गेली ३२ वर्षे सामाजिक क्षेत्रात काम करीत आहे. शहरातील नागरिकांनी आपला परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत प्रत्येकांनी प्रयत्न केले पाहिजे.

डॉ. चव्हाण म्हणाले की, सागरी स्वच्छता महाविद्यालयाच्या माध्यमातून दरवेळी किनारा स्वच्छ केला जातो. आताच्या विद्यार्थ्यांना चांगले संस्कार असल्याने कचरा कुठेही दिसला की तो कचरा डस्टबिनमध्ये टाकला जातो. त्यामुळे मुरूड स्वच्छ सुंदर असून, किनाराही स्वच्छ राहील यांची काळजी घेतली पाहिजे. बैले म्हणाले की, समुद्र हा केवळ पाण्याचा अथांग साठा नाही तर तो आपला जीवनदाता आहे. अन्न देणारा, श्वास शुद्ध करणारा आणि निसर्गाचे सौंदर्य जपणारा सागरी स्वच्छता दिनानिमित्त सहभागी होताना निसर्गाशी असलेले आपले नाते अधिक दृढ झाल्याची जाणीव झाली.


## कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२५



सर्व विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन

: प्रायोजक :
आरडीसीसी बँक
सहप्रवास प्रगतीचा
ISO 9001 - 2015 BANK

**दिनांक : २९-०८-२०२५**
प्रथम क्रमांक - अनिकेत पाटील-म्हात्रोळी,सारळ
द्वितीय क्रमांक - त्रिंबक वि. कुंटे-कुंठ्याचीगोठी
तृतीय क्रमांक - महादेव रामचंद्र दसवते-माणगांव

**दिनांक : ३०-०८-२०२५**
प्रथम क्रमांक - पांडुरंग घरत - लोणेरे-थळ
द्वितीय क्रमांक -संतोष र. खडतर - माणगांव
तृतीय क्रमांक - नागवेकर परिवार-अलिबाग

**दिनांक : ३१-०८-२०२५**
प्रथम क्रमांक - संतोष तुरे- मेढेखार अलिबाग
द्वितीय क्रमांक - रोशन शिवराम म्हसकर- पनवेल
तृतीय क्रमांक - सचिन अरुण माळी- तुडाल

**दिनांक : १-०९-२०२५**
प्रथम क्रमांक - ईश्वरी योगेश वावेकर- मेढेखार
द्वितीय क्रमांक -परेश प्रमोद घरत - कुरुळ
तृतीय क्रमांक - कल्पेश माळी- मुरुड

**दिनांक : २-०९-२०२५**
प्रथम क्रमांक - योगेश प्रकाश वार्डे- रांजणपाडा
द्वितीय क्रमांक - मोहन पाटील- सागाव अलिबाग
तृतीय क्रमांक - ह.बा. ठाकूर- चिरनेर, उरण

**दिनांक : ३-०९-२०२५**
प्रथम क्रमांक - रमेश बा. धुमाळ, नांगरवाडी
द्वितीय क्रमांक - तुषार गजानन कवळे - आवास
तृतीय क्रमांक - अनिल वर्तक- वरसोली

**दिनांक- ४-०९-२०२५**
प्रथम क्रमांक - गणेश तांदळेकर- माणगांव
द्वितीय क्रमांक - काशिनाथ पाटील - नागाव
तृतीय क्रमांक - किशोर नाईक -बोरगाव पेण

**दिनांक - ५-०९-२०२५**
प्रथम क्रमांक - संकेत साईनाथ घरत - थळपालथी
द्वितीय क्रमांक - निखिल नायसाठे- मुरुड
तृतीय क्रमांक - राजेंद्र पाटील - दिवीपारंगी

**दिनांक - ६-०९-२०२५**
प्रथम क्रमांक - गजानन पुळेकर- मुरुड
द्वितीय क्रमांक - वसंत धर्मा घरत- वरसोली
तृतीय क्रमांक - शिवाज्ञा शिवलकर- अलिबाग

विजेत्यांनी आपले बक्षीस २६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत दु. १२ ते सायं. ५ या कालावधीत कृषीवल कार्यालयातून येऊन घेऊन जाणे.

टीप : विजेत्यांनी येताना आपले फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे.

पत्ता : कृषीवल कार्यालय, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०

# स्थानिकांच्या नोकरीसाठी ठाकरे गट आक्रमक



। रोहा । प्रतिनिधी ।

धाटाव एमआयडीसी येथील नव्याने सुरु झालेल्या आयन एक्सचेंज (इंडिया) लिमिटेड या कंपनीमध्ये स्थानिक युवकांना डावळले जात आहे. त्यामुळे रोहा तालुक्यातील उच्च शिक्षित पात्र तरुण-तरुणींना रोजीरोठी पासून वंचित राहावे लागत आहे. या पुढे संबधित कंपनी प्रशासनाने स्थानिक बेरोजगार तरुणांना रोजगार न दिल्यास कंपनी प्रशासनाला शिवसेना स्टाईलने उत्तर दिले जाईल, असा इशारा शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे तालुकाप्रमुख नितीन वारंगे यांनी दिला आहे.

दरम्यान, तालुक्यातील शिवसेना (उद्धव ठाकरे) पदाधिकाऱ्यांनी कंपनी अधिकारी वर्गाची भेट घेऊन स्थानिकांच्या रोजगार संदर्भात चर्चा केली. यावेळी कंपनी व्यवस्थापनाला निवेदन देण्यात आले. रोहा तालुक्यातील असंख्य उच्च शिक्षित युवक-युवती असून त्यांना कायमस्वरूपी रोजगारात सामावून घ्यावे, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी तालुका प्रमुख नितीन वारंगे, सचिन फुलारे, मंगेश जाधव, नंदकुमार बामुगडे, राजेश काफरे, प्रीतम देशमुख, मंगेश जाधव, प्रकाश कोळीवकर, सागर भगत, ज्ञानेश्वर दळवी, चंद्रकांत कारभारी, ओमकार गुरव, प्रदीप भोई, रोहिणी गोसावी, अमृता साळूंखे सुप्रिया वारंगे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

> स्थानिक तरुणांच्या रोजगार संदर्भात आपले निवेदन प्राप्त झाले असून या संदर्भात वरिष्ठ अधिकारी वर्गाकडे आपल्या भावना पोहचविण्यात आल्या आहेत. वरिष्ठ पातळीवर चर्चा करुन त्यातून नक्कीच सकारात्मक उत्तर मिळेल.
> – आंनद रडके, एचआर एडमिशन, आयन कंपनी

# टोरंट प्रकल्पाला वंचित बहुजनचा विरोध



। वेनगाव । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील पोटल, पाली, भालिवडी, ढाक या परिसरात प्रस्तावित टोरंट पॉवर हा प्रकल्प सुरू होत आहे. या जलविद्युत प्रकल्पाला वंचित बहुजन आघाडी व सम्यक विद्यार्थी आंदोलन यांनी विरोध दर्शविला आहे. तसेच, त्यांच्यावतीने तहसीलदार मार्फत शासनाला निवेदन देण्यात आले.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष प्रदीप ढोले, धर्मेंद्र मोरे, सुनील गायकवाड, अनंत गायकवाड, प्रकाश गायकवाड, कमलाकर जाधव, सुनील वाघमारे, विक्की जाधव , प्रवीण सोनवणे, प्रदीप गायकवाड, ॲड. हिरामण गायकवाड , कमलाकर जाधव, प्रणेश यादव, दीपक गायकवाड, नितीन जाधव, सचिन जाधव, अनंत जाधव, प्रवीण गवळे, गिरीश दगडे, शैलेश खोब्रागडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



# साईनाथ गावंड यांना पुरस्कार

। उरण । प्रतिनिधी ।

लायन्स इंटरनॅशनल यांच्या वतीने शनिवार (दि.२०)उरण तालुक्यातील उत्कृष्ट शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला. मोरा येथील जे.एम. म्हात्रे प्राथमिक शाळेतील शिक्षक साईनाथ गावंड यांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. साईनाथ गावंड यांनी विविध कामे केली आहेत. त्यांची शैक्षणिक व सामाजिक बांधिलकी जपलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना लायन्स इंटरनॅशनल क्लबच्यावतीने उरणच्या प्रशासन अधिकारी संगीता माने यांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी लायन्स इंटरनॅशनल क्लबचे जिल्हा प्रांतपाल संजीव सूर्यवंशी, उरणचे अध्यक्ष डॉ. साहेबराव ओहोळ, चंद्रकांत ठक्कर, सदानंद गायकवाड, नीलिमा नारखेडे, ज्ञानेश्वर कोठावदे, दीपक पाटील, अंशू पाल, आशिष कुमार केदार आदी उपस्थित होते.

# श्रीशैल बहिरगुडे यांचा सन्मान



। आगरदांडा । प्रतिनिधी ।

समाजहितासाठी योगदान देणाऱ्या आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे मुरूड वसंतराव नाईक महाविद्यालयाचे मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. श्रीशैल बहिरगुडे यांना माधवबाग हॉस्पीटल आयोजित २०२५ वर्षीचा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कोकण विभाग शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, डॉ. राहुल जाधव व मान्यवरांच्याहस्ते बहिरगुडे यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी कोकण विभाग शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, डॉ. राहुल जाधव, दिलीप म्हसे, तुषार पाटील, महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटना रायगड पदाधिकारी उपस्थित होते.

# आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

'स्वस्थ नारी सशक्त परिवार' हे अभियान दि. १७ सप्टेंबरपासून ते २ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे. यानिमित्ताने पनवेल तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र नेरे येथे २० सप्टेंबर रोजी, गव्हाण प्राथमिक आरोग्य केंद्रात २३ सप्टेंबर रोजी, वावंजे प्राथमिक आरोग्य केंद्रात २७ सप्टेंबर रोजी, अजिवली प्राथमिक आरोग्य केंद्रात २८ सप्टेंबर रोजी व आपटा प्राथमिक आरोग्य केंद्रात १ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या आरोग्य तपासणी शिबिरामध्ये सहभागी होण्याचे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा सागर पवार यांनी केले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते, की आमच्या अशिलाने मौजे बामांडले ता. श्रीवर्धन जि. रायगड येथील

| अ.क्र. | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र | लागवड योग्य क्षेत्र | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५०६ | ०-२०-० | ०-१८-०० | ०-०२-०० | ०-०८ |

मालकाचे नाव :- श्रीमती मालिनी संजीव कालुरकर, श्रीम. दीप्ती संजीव कालुरकर व गौरी संजीव कालुरकर

यांचेकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याच्या बोलीसह सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याबाबत मिळकत मालकाचे म्हणणे असून ती त्याच्या आजपर्यंत ताबे कब्जा व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असून प्रत्यक्ष कसवणूकी खाली आहे. सदर जमीन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधित सरकारी कार्यालयाकडून योग्य ती परवानगी, वहिवाट ताबा बयाना पावती अत्यारपत्र, साठे करार गहाण बोजा, भाडेपट्टा मृत्युपत्रांकित दान जप्ती लीन बक्षिसी ट्रस्ट पोटगी वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हीत संबंध असल्यास, तसेच नमूद मिळकतीच्या हद्दी खुणावरून कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाची आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणारे वकील यांच्याकडे पाठवावे वकिलाची खात्री पटवून द्यावी.

विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व भुजा विरहित आहे असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतीही हक्क व हे संबंध नाही असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरून आमच्याशी संबंधित मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचे वर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ :- श्रीवर्धन
दिनांक :- २१/०९/२०२५
कार्यालयीन पत्ता — सही/-
रा.ग स. कातकर सभागृह गाळा — (ॲड. संतोष मारुती सापते)
नंबर दोन वाणी श्रीवर्धन ता. श्रीवर्धन जि रायगड

## महाराष्ट्र शासन
### महसूल व वनविभाग
### जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग
### मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयाचे आवारात, अलिबाग ४०२२०१ दुरध्वनी क्र. ०२१४१ २२२४२८,
Email: dslrraigad@gmail.com

क्र.अपील/एस.आर.२१/२०२५/ता. महाड/जि.रायगड/२०२५/२०११
अलिबाग दिनांक १९/०९/२०२५

जाहिर नोटीस

प्रति
१. श्री विश्वास विनायक पेठे
२. श्री. विवेक विनायक पेठे — अपीलदार
३. श्री. विजय विनायक पेठे
४. श्री. वसंत विनायक पेठे
५. प्रभावती गजानन पेठे
६. श्री. सुरेश गजानन पेठे
७. श्री. संजय गजानन पेठे
८. सुवर्णा शशंक ताम्हणकर
९. अनुराधा प्रशांत रानडे
सर्व रा. महाड, काकरतळे, ता. महाड, जि. रायगड

विरुध्द

१. उप अधीक्षक भूमि अभिलेख, महाड ता. महाड, जि. रायगड — जाबदार
२. नगर भूमापन अधिकारी तथा चौकशी अधिकारी ता. महाड, जि. रायगड
३. श्री. विश्वास गोपाळ पेंडसे रा. गणपती मंदिरासमोर, काकरतळे, मु.पो. महाड, ता. महाड, जि. रायगड ४०२३०१

विषय :- मौजे महाड, ता. महाड, जि. रायगड येथील सि.स.नं. १६८० या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत.

संदर्भ :- १. अर्जदार श्री. विश्वास विनायक पेठे व इतर यांचा दिनांक २१/०८/२०२४ चा अपील अर्ज.
२. इकडील पत्र क्र.अपील क्र.२१/२०२५/जा.क्र. १८३५ दिनांक १८/०८/२०२५

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपील प्रकरण दाखल करुन घेणेकामी सुनावणीची तारीख १५.०७.२०२५, २९.०७.२०२५, १२.०८.२०२५, २६.०८.२०२५ व १६.०९.२०२५ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहिर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार यांना आणखी एक सुनावणी-ची संधी देण्यात येत असून सुनावणी पुढील तारीख २३/०९/२०२५ नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी सकाळी दुपारी ११.०० वाजता आपण पुराव्याचे मुळ कागदपत्रांसह जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजुन आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १९/०९/२०२५

(सुनिल इंदलकर)
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख
रायगड, मु. अलिबाग.

# 'रोटरी'कडून आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

। महाड । प्रतिनिधी ।

रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट महाडच्या माध्यमातून जिल्ह्यातील महाड व पोलादपूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक विभागातून १२ आदर्श शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यामध्ये पोलादपूर तालुक्यातून सुनील पवार, शाहिर आवारे, पूजा बिरादार, पंकज मिरजोळकर, नितीन दीक्षित, रश्मी जंगम व महाड तालुक्यातून विजय जाधव, मनिषा यादव, संगीता बटुले-बारगजे, स्मिता नवघरे, सोनाली कालगुडे व ज्युली डिसोझा या शिक्षकांचा समावेश आहे. अशी माहिती रोटरी प्रेसिडेंट जॉन्सन डिसोझा, सेक्रेटरी चेतन पालांडे व खजिनदार जगदिश वर्तक, लिटरसी डायरेक्टर विकास सिंग व प्रोजेक्ट चेअरमन प्रदीप पवार यांनी दिली. पोलादपूर येथील रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यामंदिर येथे बुधवारी (दि.२४) या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


अर्जदारातर्फे वकील
ॲड. महेश बाळाराम देसले

जाहीर नोटीस/कोर्टात हजर राहणेबाबत समन्स
अलिबाग येथिल मे . न्यायाधीश कौटुंबिक न्यायालय अलिबाग सो. यांचे कोर्टात
पिटीशन ए ३७/२०२५
निशाणी क्रमांक: १६/ड
नेमलेली तारीख : ३१/१०/२०२५

श्री. पांडुरंग वामन जाधव
उ. वय ५३ वर्षे, धंदा-मोलमजूरी
रा. मु. जावळी पो. वरसई, — अर्जदार
ता. पेण, जिल्हा - रायगड
आधार कार्ड नं. ९५४४९२७८८६५४
मो. नं.

विरूध्द

सौ. प्रिती पांडुरंग जाधव
पूर्वाश्रमीचे नाव आशा नारायण कदम
C/O नारायण रामचंद्र कदम — सा.वाली
रा. धाकटे वेणगाव ता. कर्जत,
जिल्हा रायगड,

ज्या अर्थी वरील अर्जदार व सा वाली हे पती पत्नी असून त्यांचा विवाह दिनांक २८/०४/२००४ (अठ्ठावीस एप्रिल दोन हजार चार) रोजी हिंदू धर्मशास्त्र व जातीरिवाजा प्रमाणे मु. पो. तालुका कर्जत, जिल्हा-रायगड रोजी झाला आहे. सामनेवाली ही अर्जदार यांचेपासून विभक्त राहात आहे. अर्जदार यांनी सामनेवाली विरूध्द वरील कौटुंबिक न्यायालयात विवाह विच्छेदन/घटस्फोट मिळणेकरिता अर्ज/पिटीशन दाखल केलेला आहे. वरील नमुद पत्त्यावर तुम्हाला कोर्टाची नोटीस/समन्स पाठविणेत आले असता तुम्ही ते हेतूपुरस्सर स्विकारत नाहीत. त्यामुळे कोर्टाची नोटीस/समन्स तुम्हाला न बजावता परत आली आहे. सबब या वृत्तपत्रातील नोटीसव्दारे तुम्हाला जाहीररित्या कळविणेत येते की, तुम्ही पिटीशन ए .नं.३७/२०२५ चे कामी अलिबाग येथील कौटुंबिक न्यायालयात दिनांक ३१/१०/२०२५ रोजी ठिक सकाळी १० वा. ३० मि .पटीशनचे कामी न चुकता स्वतः अथवा तुम्ही नेमलेल्या अधिकृत प्रतिनिधीमार्फत हजर राहून तुमचे म्हणणे सादर करावे.

जर वरील तारखेस तुम्ही स्वतः अथवा तुमच्या वतीने अधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून तुमचे म्हणणे सादर न केल्यास तुमचे विरूध्द एकतर्फी आदेश पारीत करण्यात येतील याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे माझ्या शिक्यानिशी आज रोजी नोटीस दिली. याची नोंद घ्यावी .

सही/- कनिष्ठ लिपिक कौटुंबिक न्यायालय अलिबाग — कोर्टाचा शिक्का — सही/- प्रबंधक कौटुंबिक न्यायालय अलिबाग

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अलिबाग
RDCC Bank Let's grow together ISO 9001:2008 BANK
### निविदा सूचना

बँकेकरीता सन २०२६ सालांसाठी डायऱ्या तीन प्रकारच्या नमुन्यात बँकेच्या माहितीच्या तपशीलासह छापून घ्यावयाच्या आहेत.
१.व्ही.आय.पी.एक्झीक्युटीव्ह
२. मध्यम आकाराची
३. लहान आकाराची

तरी अशा तीनही प्रकारच्या डायऱ्या, बँकेच्या माहितीच्या तपशीलासह छपाई करण्याच्या असून सदरच्या छपाईसह डायऱ्यांची निविदा मागविण्यांत येत आहे. ज्या निविदा धारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत व त्यांनी आपल्या सिलबंद निविदा दिनांक २२-०९-२०२५ ते दिनांक ३०-०९-२०२५ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे खाली सही करणार स्वाक्षरीकार यांचेकडे सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

एक किंवा सर्व निविदा नाकारणेचा अधिकार बँकेचे संचालक मंडळ राखून ठेवीत आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी
केंद्र कार्यालय अलिबाग.
दिनांक :- २२-०९-२०२५

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अलिबाग
RDCC Bank Let's grow together ISO 9001:2008 BANK
### निविदा सूचना

बँकेकरीता सन २०२६ सालाकरीता कॅलेंडर्स छपाई करुन घेणेचे आहेत. कॅलेंडर्स छपाई करुन घेणेकरता जिल्ह्यातील सहकारी मुद्रक संस्थांकडून तसेच संबंधित व्यवसायिकांकडून निविदा मागविण्यांत येत आहेत.

कॅलेंडर्सचा सविस्तर तपशील बँकेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. ज्या निविदा धारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत त्यांनी आपल्या सिलबंद निविदा दिनांक २२-०९-२०२५ ते दिनांक ३०-०९-२०२५ पर्यंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यात.

एक किंवा सर्व निविदा नाकारणेचा अधिकार बँकेचे संचालक मंडळ राखून ठेवीत आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी
केंद्र कार्यालय अलिबाग.
दिनांक :- २२-०९-२०२५

# भावना ग्रुपतर्फे वृक्षारोपण

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी भावना ग्रुपतर्फे वृक्षारोपण सोहळा जुईनगर येथे संपन्न झाला. भावना ग्रुपच्या अपर्णा राजेश शहा यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. वृक्षारोपण केल्यानंतर सर्व कर्मचाऱ्यांचा आनंदाने चेहरा खुलला, निसर्गाला आपली एक आभारयुक्त एक छोटी भेट दिली. याप्रसंगी डॉ. राजेश पाटील जिल्हाध्यक्ष नवी मुंबई (भाजप) आणि नरेश सुतार समाजसेवक यांनीदेखील हजेरी लावली. शेवटी अपर्णा शहा यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वंजारवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आहे, या मिळकतींचे मालक सविता घनश्याम गाजरे व समृद्धी घनश्याम गाजरे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर/प्लॉट नंबर | क्षेत्रफळ आर. चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ८/२/अ/१० | ०४-५१ (४५१ चौ.मी. ) | ४५-१० |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकत व त्यामधील घर या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २२ सप्टेंबर २०२५

ॲड.शरद आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग, विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## उपविभागीय अधिकारी सुधागड, उपविभाग रोहा यांच्या न्यायालयात
## जाहीर नोटीस

**सुनावणीची नोटीस** — आर.टी.एस विलंबमाफी अपिल क्र.८८/२०२५

१) श्री. संतोष शिवराम भोईर रा. राबगाव ता. सुधागड
२) श्रीम. कुसुम हरीश्चंद्र मोहिते रा.नडवली, पो. देवकान्हे, ता. रोहा — अपिलार्थी
३) श्रीम. कल्पना कृष्णा जाधव रा. तामसोली, पो. ऐनघर, ता. रोहा

विरुध्द

**बळीराम पांडू भोईर (मततर्फे वारस**
१) श्री. अशोक बळीराम भोईर रा. राबगाव ता. सुधागड
२) श्रीम. बेबी बाळाराम बारस्कर रा. राजखलाटी, पो.विठठलवाडी,ता.रोहा,
३) श्रीम. गंगू मोरेश्वर जांबळकर रा. खांडसई, पो. सिध्देश्वर, ता. सुधागड

**किसन बळीराम भोईर (मयत) तर्फे वारस**
४) श्रीम. मिना किसन भोईर
५) श्री. श्रीकांत किसन भोईर अ.क्र. ४ व ५ रा. पाली, ता. सुधागड
६) श्रीम.श्रृती सुशील मालुस्कर रा. बुरमाळी, पाली, ता. सुधागड

**वामन पांडू भोईर (मयत) तर्फे वारस** — उत्तरार्थी
७) श्रीम. शेवंता वामन भोईर रा. राबगाव, ता. सुधागड
८) गिता चंद्रकांत शेलार रा. रेवाली पो. मेढा ता. रोहा
९) श्रीम. मिना राजेंद्र चोरघे रा. खांडसई, पो. सिध्देश्वर, ता. सुधागड
१०) श्रीम. लता सुधीर निंबरे रा. राबगाव ता. सुधागड
११) श्री नितीन वामन भोईर, रा. राबगाव, ता. सुधागड

**गणपत पांडू भोईर (मयत) तर्फे वारस**
१२) प्रेमा गणपत भोईर रा. राबगाव ता. सुधागड
१३) श्री. चंद्रकांत गणपत भोईर रा. राबगाव ता. सुधागड

**घनश्याम गणपत भोईर (मयत) तर्फे वारस**
१४) श्रीम. धनश्री घनश्याम भोईर
१५) श्री. गौरव घनश्याम भोईर
१६) श्रीम. जागृती घनश्याम भोईर
अ.क्र.१४ ते १६ रा. राबगाव, ता. सुधागड
१७) श्री. सुभाष बबन मानकर रा. मुळशी, पो. जांभुळपाडा, ता. सुधागड.
१८) रमजान मोहमद शेख
१९) शहादत हुसेन मोहम्मद रज्जाक
अ.क्र.१८ व १९ रा.रुम नं. २३१, जखेरीया बंदर, पुटपाथ, जखेरीया बंदर रोड, शिवडी ४०००१५
२०) दर्शनकुमार चांगमल आगरवाल रा. वियय महाल बिल्डींग, डी रोड चर्चगेट मुंबई ४०००२०
२१) निलेश धिरजलाल सावळा
२२) केतकी मनोज शहा
अ.क्र.२१ व २२ रा.३/४ प्रेम अशिष आर. एच. बी. रोड मुलूंड पश्चिम मुंबई ४०००८०
२३) रामचंद्र राया भोईर रा. राबगाव, ता.सुधागड
२४) सुशिल नारायण कौशिक अविष्कार रिअल्टी प्रा.लि. ऑफीस जांभुळपाडा, पाली खोपोली रोडलगत, अंबा नदी पुलाच्या डाव्या बाजूस, ता. सुधागड — उत्तरार्थी
२५) उषा श्रीराम रा. ३०१ शेवरी अंगण १९९१ रस्ता चेंबुर मुंबई ४०००७१
२६) उत्तमकुमार नेणमल परमार रा. कुंभार आळी, बेन्नीबिस्ट्रो कॅफेच्या वरील मजला ता. सुधागड
२७) प्रकाश अर्जुन देसाई रा. वरची आळी, तलावाच्या शेजारी पाली, ता. सुधागड
२८) अविष्कार रिअल्टी प्रा.लि. ऑफीस जांभुळपाडा, पाली खोपोली रोडलगत, अंबा नदी पुलाच्या डाव्या बाजूस, ता. सुधागड

सर्व संबंधितांना या नोटीसीव्दारे सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी या न्यायालयात मौजे राबगाव ता. सुधागड येथील स.नं. ६६/१/१, ४८/२/अ/१, २८/२/अ, २९/८/अ, ३३/३, ८३/४६, १९/९, ३५/१० या मिळकतीबाबत फेरफार क्र. १११३ च्या विरोधात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये या कार्यालयात दाखल केले आहे.

सबब या नोटीसीव्दारे तमाम संबंधितांना कळविण्यात येते की, या अपिलाकामी सुनावणी आयोजीत करण्यात आलेली आहे. तरी संबंधितांनी दि. २५/९/२०२५ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, सुधागड येथे आमचे कार्यालयात सकाळी १२-०० वाजता आपण स्वतः वा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर रहावे. नमूद तारखेस हजर न राहील्यास सदर अपिलामध्ये गुणवत्तेवर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरहू नोटीस माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्या निशी दिली असे दि.१८/९/२०२५
दि. १८/८/२०२५ — सही/-
ठिकाण- सुधागड-पाली — (सायली ठाकूर)
उपविभागीय अधिकारी सुधागड

## निवडक

### पदार्पणातच सूरज चमकला

**मुंबई :** भारताचा युवा कुस्तीपटू सूरज वशिष्ठने वरिष्ठ जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत पदार्पणातच आपली चमक दाखवली. ६० किलो ग्रीको-रोमन गटात त्याने सलग दोन विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारली, पण सर्बियाच्या जॉर्जिज तिबिलोवकडून १-४ असा पराभव पत्करावा लागल्याने त्याचे



आव्हान संपुष्टात आले. तरीही त्याच्या या दमदार खेळाने हिंदुस्थानच्या कुस्ती भविष्यासाठी मोठी आशा निर्माण केली आहे. पहिल्याच सामन्यात सूरजने एंजेल टेलेजला ३-१ ने हरवले. दुसरया सामन्यात मोलदोवाच्या विक्टर सियोबानूवर ३-१ ने मात केली, पण उपांत्यपूर्व फेरीमध्ये सर्बियाच्या तिबिलोवकडून १-४ ने पराभव झाला. भारताच्या अन्य ग्रीको-रोमन कुस्तीपटूंनीही समाधानकारक खेळ केला. ७२ किलो वजनी गटात अंकित गुलिया कोरियाच्या योंगहुन नोहकडून क्वालिफिकेशन फेरीत तांत्रिक श्रेष्ठतेने पराभूत झाला.



### नाशिकमध्ये रंगणार रणजीचे सामने

**नाशिक :** रणजी क्रिकेट स्पर्धेतील यंदाच्या हंगामातील दोन क्रिकेट सामने नाशिकला खेळविले जाणार आहेत. नोव्हेंबर महिन्यात महाराष्ट्र विरुद्ध सौराष्ट्रचा सामना १ ते ४ नोव्हेंबर दरम्यान, तर महाराष्ट्र विरुद्ध कर्नाटकचा सामना ८ ते ११ नोव्हेंबर दरम्यान खेळविला जाणार आहे. २०२५-२६ हंगामात सामने आयोजनासाठी नाशिकची निवड केली आहे. तिन्ही सामने हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर खेळविले जाणार आहेत. जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष विनोद शहा यांच्या नेतृत्वाखाली, सचिव समीर रकटे यांच्यासह पदाधिकारी यांना यापूर्वीच्या अकरापेक्षा जास्त रणजी सामन्यांच्या यशस्वी आयोजनाचा अनुभव आहे. आयोजक म्हणून जिल्हा क्रिकेट संघटनेची निवड झाल्याबद्दल अध्यक्ष शहा, सचिव रकटे यांनी आनंद व्यक्त केला आहे..खेळाडूंच्या सहभागाकडे लक्ष महाराष्ट्र संघात नव्यानेच सहभागी झालेला आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू पृथ्वी शॉ याचा खेळ बघणे क्रीडाप्रेमींसाठी आकर्षण ठरणार आहे.

### सूर्यकुमारने टाळला पाकचा उल्लेख

**नवी दिल्ली :**आशिया चषकातील भारत-पाकिस्तान सामन्यापूर्वी भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने १४० कोटी भारतीयांना विजयाची भेट देण्यासाठी आपण निर्धाराने मैदानावर उतरणार असल्याचे अभिवचन दिले. ठळक वैशिष्ट्य म्हणजे, १२ मिनिटांच्या पत्रकार परिषदेत सूर्यकुमारला भारत-पाकिस्तान सामन्याबद्दल सहा प्रश्न



विचारण्यात आले. मात्र कशी असेल, यावर काहीही बोलणे टाळले. सूर्यकुमार याप्रसंगी पुढे म्हणाला, या स्पर्धेसाठी आमची तयारी खूप चांगली झाली आहे. आम्ही मागील तीन सामन्यांत उत्तम खेळलो आहोत. सर्वोत्तम निकाल मिळवण्यासाठी सर्वोत्तम प्रयत्न करणे, हेच आमचे मुख्य लक्ष्य असेल. मागील दोन-तीन सामन्यांमधून घेतलेले सकारात्मक धडे येथे आमच्यासाठी उपयुक्त ठरतील. मागील लढतीत आम्ही पाकिस्तानला हरवले आहे, पण, आम्ही त्यांना एकदा हरवले याचा अर्थ आम्हाला फायदा मिळेल असे नाही. आम्हाला पुन्हा एकदा चांगली सुरुवात करावी लागेल आणि जो संघ चांगला खेळेल तोच सामना जिंकेल असे त्यांनी सांगितले.

### 'चायना मास्टर्स'मधून सिंधू बाहेर

**शेंझेन :** भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिचा जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या ॲन से यंग विरुद्धचा खराब फॉर्म कायम राहिला आहे. शुक्रवारी 'चायना मास्टर्स सुपर ७५०' बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत तिला कोरियन खेळाडू ॲन-से यंगकडून पराभव पत्करावा लागला. या पराभवामुळे सिंधू स्पर्धेतून बाहेर पडली. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या २३ वर्षीय ॲन-से यंगने सिंधूला ३८ मिनिटांत १४-२१, १३-२१ अशा सरळ गेममध्ये हरवले. ॲन से यंगविरुद्ध सिंधूचा हा सलग आठवा पराभव असून,



तिला अजूनही एकही सामना जिंकता आलेला नाही. पहिल्या गेममध्ये सिंधूने १-६ अशी खराब सुरुवात केली, पण नंतर तिने ५-९ अशी आघाडी कमी केली. मात्र, ॲनने तिचा ट्रेडमार्क स्मॅश वापरून ११-५ अशी आघाडी घेतली. सिंधूने ११-१४ अशी पिछाडी भरून काढण्याचा प्रयत्न केला, पण कोरियन खेळाडूने आपली पकड कायम ठेवली आणि पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्ये सिंधूने ३-२ अशी थोडी आघाडी घेतली, पण ॲनने लगेचच नियंत्रण मिळवत सिंधूचा पराभव केला.

### मेस्सीची जादू कायम

**फ्लोरिडा :** फुटबॉल जगतातील सुपरस्टार लिओनेल मेस्सीने पुन्हा एकदा आपल्या जादुई खेळाचे प्रदर्शन करत इंटर मियामीला महत्त्वपूर्ण विजय मिळवून दिला. शनिवारी मेजर लीग सॉकरच्या एका रोमांचक सामन्यात मेस्सीने दोन शानदार गोलाच्या जोरावर इंटर मियामीला डीसी युनायटेडवर ३-२ असा विजय मिळवून दिला. मेस्सीचा दैदिप्यमान फॉर्म कायममेस्सीने या विजयासह हंगामातील आपले २२ गोल पूर्ण केले आहेत. विशेष म्हणजे, त्याने केवळ २२ सामन्यांमध्ये ही कामगिरी केली आहे, ज्यामुळे तो आता नॅशविलेच्या सॅम सरिजला मागे टाकत एमएलएसच्या सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत अव्वल स्थानी पोहोचला आहे.

# रोहा संघ अंतिम विजेता

**सागरी सुरक्षा चषक २०२५ कबड्डी स्पर्धा**

**अलिबागच्या समुद्र किनाऱ्यावर रंगला थरार**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सागरी सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी रायगड पोलिसांच्या वतीने साखळी कबड्डी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतील अंतिम लढत रोहा आणि मुरूड संघात झाली. रोहा संघाने मुरूड संघावर मात करीत विजेत्या पदावर नाव कोरले. हा संघ अंतिम विजेता ठरला. या संघाला ५१ हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात आले. रविवारी सायंकाळी अलिबागच्या समुद्रकिनाऱ्यावर कबड्डीचा थरार रंगला. या स्पर्धेचा आनंद हजारो क्रिडा प्रेमींनी तसेच पर्यटकांनी लुटला.

सागरी मार्गाने होणाऱ्या हल्ल्याविरोधात पावले उचलण्यासाठी रायगड पोलीसांनी एक नाविन्य उपक्रम हाती घेतला. मच्छीमार, सुरक्षा दल यांच्यासमवेत समन्वय राखण्यासाठी तसेच त्यांच्या सोबत कायम संवाद साधण्यासाठी कबड्डी साखळी स्पर्धा आयोजित करण्यात आली. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या संकल्पनेतून सागरी सुरक्षा चषक





**महिलांमध्ये पेण संघ विजेता**

**जिल्ह्यामध्ये १२ सप्टेंबरपासून साखळी कबड्डी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत महिला संघानेदेखील सहभाग घेतला. रविवारी (दि.२१) झालेल्या अंतिम सामन्यात पेण संघ विजेता ठरला. दिघी सागरी संघाने द्वीतीय क्रमांक मिळविले असून मांडवा सागरी संघाने तृतीय क्रमांक मिळवून चषकांवर शिक्का मोर्तब केला. तसेच उत्कृष्ट पक्कड म्हणून चैताली म्हात्रे यांना गौरविण्यात आले. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या हस्ते या संघाचा व खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.**

कबड्डी साखळी स्पर्धा घेण्यात आली. या संघात १६ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेचा शुभारंभ मांडवा बंदरावर झाला. त्यानंतर मुरूड, रेवदंडा, श्रीवर्धन येथील समुद्रकिनारी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेची उपउपांत्य फेरी शनिवारी सायंकाळी अलिबाग समुद्रकिनारी झाली. या स्पर्धेत आठ संघ सहभागी झाले होते. त्यातून नागोठणे, पोयनाड, रोहा,मुरूड या चार संघाची उपांत्य फेरीसाठी निवड झाली. रविवारी सायंकाळी उपांत्य फेरीला सुरुवात झाली.

पहिली उपांत्य फेरीचा सामना पद्मदुर्ग मूरूड आणि नागोठणे फायटर बुल्स या संघात झाला. नागोठणे संघाने २१ आणि मुरूड संघाने ३१ गुण मिळवून मुरूड संघाने दहा गुणांनी विजयाची सलामी दिली. पहिल्या उपांत्य फेरीमध्ये मुरूड संघ विजेता ठरला. या संघाची अंतिम सामन्यासाठी निवड झाली. दुसऱ्या उपांत्य फेरीचा सामना रोहा फायटर्स आणि किंग्ज ऑफ पोयनाड या संघात झाला. रोहा संघाने ३६ गुण मिळवून विजय संपादन केले.

तिसऱ्या उपांत्य फेरीचा सामना नागोठणे आणि पोयनाड संघात झाला. यामध्ये नागोठणे संघाने २० आणि पोयनाड संघाने २४ गुण मिळविले. ही स्पर्धा अटीतटीची झाली. अखेर पोयनाड संघ विजयी झाला. अंतिम सामना रोहा व मुरूड संघात झाला. रोहा संघाने आघाडी घेत विजय आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न केला. शेवटच्या क्षणापर्यंत ही लढत अटीतटीची झाली. अखेर रोहा संघाने मुरूड संघावर मात करीत अंतिम विजेतेपद पटकावले.

रोहा या अंतिम विजेत्या संघाला रोख ५१ हजार रुपये व चषक, मुरूड या संघाला द्वीतीय क्रमांकाचे ३१ हजार रुपये व चषक, पोयनाड संघाला तृतीय क्रमांकाचे रोख २१ हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच उत्कृष्ट खेळाडू म्हणून रोशन मढवी, उत्कृष्ट चढाई म्हणून अनिरुध्द भोसले आणि उत्कृष्ट पक्कड म्हणून अतिश मोरे यांना चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अलिबागच्या उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे यांच्या हस्ते विजेत्या संघाचा आणि उत्कृष्ट खेळाडूंचा गौरव करण्यात आला. यावेळी अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे, मांडवा सागरी पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे, सुरक्षा शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे, पोयनाडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख, मच्छिमार, सागरी सुरक्षा दल, नागरिक, पोलीस अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. स्पर्धेचे समालोचन विश्वनाथ पाटील आणि संजय पोईलकर यांनी केले.

## कुस्ती स्पर्धेत पांघलला कांस्यपदक

**। झाग्रेब । वृत्तसंस्था ।**

झाग्रेब येथे सुरू असलेल्या जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या अंतिम पांघलने कांस्यपदक जिंकले. तिने ५३ किलो वजनी गटातील कांस्यपदकाच्या लढतीत स्विडनच्या एम्मा माल्मग्रेनचा ९-१ असा पराभव केला. या विजयासह या वर्षी भारताची ती पहिली आणि एकमेव फ्रीस्टाईल पदक विजेती ठरली आहे. अंतिमने २०२३ च्या बुडापेस्ट येथील गेल्या स्पर्धेतही कांस्यपदक जिंकले होते. एका बाजूला ग्रीको-रोमन प्रकारात भारताच्या चारही मल्लांना पहिल्याच फेरीत पराभवाचा सामना करावा लागला, तर दुसर्या बाजूला अंतिम पांघलने भारतासाठी आनंदाची बातमी दिली. बुधवारी २१ वर्षीय अंतिमला उपांत्य फेरीच्या अटीतटीच्या सामन्यात पॅरिस ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक विजेत्या इक्वाडोरच्या लुसिया येपेझकडून पराभव पत्करावा लागला होता. .येपेझ अंतिम फेरीत पोहोचल्यामुळे अंतिमला कांस्यपदकासाठी पुन्हा संधी मिळाली. कांस्यपदकाच्या लढतीत अंतिमने उत्कृष्ट आक्रमण, अचूक फुटवर्क आणि बचावाचे तंत्र



दाखवत माल्मग्रेनला प्रभावीपणे रोखले. पहिल्या फेरीत अंतिमने ३-० अशी आघाडी घेतली. दुसऱ्या आणि अंतिम फेरीत अंतिमने प्रति-आक्रमण आणि टेकडाऊन्सच्या मदतीने आपली आघाडी वाढवली. विनेश फोगाटनंतर जागतिक स्पर्धेत दोन पदके जिंकणारी ती दुसरी भारतीय महिला कुस्तीपटू बनली. विनेशने देखील दोन कांस्यपदके जिंकली आहेत.. अंतिमने २०२३ च्या बुडापेस्ट येथील मागील स्पर्धेतही कांस्यपदक जिंकले होते, जिथे तिने याच प्रतिस्पर्धकाचा १६-६ असा पराभव केला होता. मात्र, २०२४ मध्ये हंगेरी रँकिंग सीरिजमधील त्यांच्या सर्वात अलीकडील सामन्यात, माल्मग्रेनने अंतिमचा ४-० ने पराभव केला होता.

## बीसीसीआयला मिळणार नवा अध्यक्ष

**नवी दिल्ली :** गेल्या काही दिवसांपासून बीसीसीआयचा नवा अध्यक्ष कोण होणार, याची चर्चा सुरु आहे. यासाठी दिग्गजांची खेळाडूंची नावं चर्चेत आहेत. २८ सप्टेंबर रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेत नव्या अध्यक्षांच्या नावावर शिक्कामोर्तब होणार आहे. मात्र, त्यापूर्वी बीसीसीआयचा अध्यक्ष ठरल्याची माहिती समोर आली आहे. बीसीसीआयच्या अध्यक्षपदी माजी क्रिकेटपटू मिथुन मनहास यांची निवड निश्चित झाल्याची माहिती आहे. २८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या सभेत मनहास यांच्याकडे अध्यक्षपदाची सूत्रे दिली जातील. माजी अध्यक्ष रॉजर बिन्नी यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त आहे. त्यानुसार आता मनहास याचे नाव पुढे आले आहे.

## भारत-पाक पुन्हा आमने-सामने

**। अबुधाबी । वृत्तसंस्था ।**

आशिया कप २०२५ स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान सुपर फोर फेरीत पुन्हा आमने-सामने आले आहेत. भारताने साखळी फेरीत पाकिस्तानला ७ विकेट्सने पराभूत केले होते. भारतीय कर्णधार सूर्यकुमारने नाणेफेकीवेळी हस्तांदोलन टाळले आहे. आशिया कप २०२५ स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान रविवार (दि.२१) सप्टेंबर रोजी दुसऱ्यांदा आमने-सामने आले आहेत. या दोन्ही संघांनी साखळी फेरीनंतर 'अ' गटातून पहिल्या दोन क्रमांकामध्ये स्थान मिळवल्याने सुपर फोर फेरीत स्थान मिळवले होते. त्यामुळे आता सुपर फोरमध्ये पुन्हा हे दोन संघ आमने - सामने आहेत. सुपर फोरमधील दोन्ही संघांचा हा पहिलाच सामना आहे. दरम्यान, साखळी फेरीत भारताने पाकिस्तानला ७ विकेट्सने सहज पराभूत केले होते. आता सुपर फोरमध्येही भारतीय संघ आपली विजयी लय कायम ठेवण्याचा प्रयत्न करेल.

दरम्यान, नाणेफेकीनंतर दोन्ही कर्णधारांमध्ये हस्तांदोलन झाले नाही. या सामन्यासाठी दोन्ही संघांनी प्लेइंग इलेव्हनमध्ये बदल केले आहेत. भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये जसप्रीत बुमराह आणि वरुण चक्रवर्ती यांचे पुनरागमन झाले आहे. त्यांना अर्शदीप आणि हर्षित यांच्या जागेवर संधी देण्यात आली आहे. पाकिस्ताननेही प्लेइंग इलेव्हनमध्ये दोन बदल केले असून त्यांनी हसन नवाझ आणि खुशदील शाह यांना बाहेर केले आहे. त्यांच्याजागेवर हुसैन तलत आणि फहिम अश्रफ यांना संधी दिली आहे.प्लेइंग इलेव्हन भारत - अभिषेक शर्मा, शुभमन गिल, संजू सॅमसन, सूर्यकुमार यादव (कर्णधार), तिलक वर्मा, शिवम दुबे, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव, वरुण चक्रवर्ती संघात आहेत.

## ग्रिफिन्स-हॉक्स विजेतेपदासाठी भिडणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

ग्रिफिन्स, हॉक्स या संघांनी अनुक्रमे रेव्हन्स, स्वान्स या संघांचा पराभव करून अकराव्या पीवायसी ट्रम्पैस करंडक बैडमिंटन साखळी स्पर्धेत अंतिम फेरीत प्रवेश केला. आता उभय संघ विजेतेपदासाठी भिडणार आहेत.



पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या बॅडमिंटन कोर्टवर ही स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत वरिष्ठ गटाच्या पहिल्या उपांत्य लढतीत ग्रिफिन्स संघाने स्वान्स संघाचा ४०० असा एकतर्फी पराभव करून दिमाखात अंतिम फेरी गाठली, ग्रिफिन्स संघाकडून अनिकेत शिंदि, सौहम जोशी, अविनाश दोशी, बिपीन देव, आकाश सूर्यवंशी, आरुषी पांडे, निखिल भाटे, नीलेश केळकर यांनी अफलातून खेळी केली. दुसऱ्या उपांत्य लढतीत हेमंत पाळंदै, पराग चौपडा, चिन्मय जोशी, राधिका इंगळहळीकर, अक्षय ओक, सिद्धांत खिंवसरा, अभिषेक ताम्हाणे, यश मेहेंदळे यांच्या विजयी कामगिरीच्या जोरावर हॉक्स संघाने रेव्हन्सचा ४-३ असा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली.

## अँडी पायक्रॉफ्टचं भूत पुन्हा पाकिस्तानच्या मानगुटीवर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशिया २०२५ स्पर्धेतील सुपर ४ फेरीत भारत आणि पाकिस्तान हे संघ आमनेसामने येणार आहेत. या सामन्यात कोण बाजी मारणार याची उत्सुकता तर आहे. पण सामनाधिकाऱ्याची भूमिका कोण बजावणार याबाबतची चर्चा रंगली आहे. असं असताना ही जबाबदारी पुन्हा एकदा सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांच्या खांद्यावर टाकण्यात आली आहे. त्यामुळे पाकिस्तानचा संघ आता काय करणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. २१ सप्टेंबरला दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये होणाऱ्या भारत पाकिस्तान सामन्यात पायक्रॉफ्ट सामनाधिकाऱ्याची भूमिका बजावणार आहे. त्यामुळे



पाकिस्तानच्या भूमिकेकडे लक्ष लागून आहे. पाकिस्तानने साख-ळी फेरीतील सामन्यातील हँडशेक प्रकरणासाठी पायक्रॉफ्ट यांना जबाबदार धरलं होतं. तसेच त्यांची स्पर्धेतून हकालपट्टी करण्याची मागणी केली होती.

पायक्रॉफ्ट हे पाकिस्तान आणि युएई सामन्यात सामनाधिकारी होते. त्यामुळे पाकिस्तानने त्यांची हकालपट्टी करण्याची नाटकी सुरु केली होती. सामना खेळणार नाही अशी भूमिका घेतली होती. आयसीसीकडे विनंती केली होती की, त्यांना या स्पर्धेतून बाहेर काढा. पण आयसीसीने पाकिस्तानच्या मागणीला केराची टोपली दाखवली. त्यामुळे पाकिस्तान बॅकफूटवर आला. त्यानंतर या प्रकरणावर पायक्रॉफ्ट यांनी आपली बाजू मांडली. त्यानंतर पाकिस्तान मान खाली घालून सामना खेळला. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानसोबतचे सर्व संबंध मोडले आहेत. या स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानशी खेळाडूंशी हस्तांदोलन केलं नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानची नाचक्की झाली होती. यासाठी पाकिस्तानने पायक्रॉफ्ट यांना जबाबदार धरलं होते.

## शिवाजी पार्क नवीन वास्तूचे लोकार्पण

**मुंबई :** पुनर्बांधणीच्या कामामुळे गेल्या दीड वर्षापासून बंद असलेला दादर येथील ऐतिहासिक शिवाजी पार्क जिमखाना पुन्हा सर्वांच्या भेटीला येणार आहे. जिमखान्याला हेरिटेज लूक देण्यात आला असून घटस्थापनेच्या मुहूर्तावर सोमवारी सकाळी १० वाजता नव्या वास्तूचे दिमाखात लोकार्पण होणार आहे. १९०९ साली हा जिमखाना सुरू झाला त्यावेळेस त्याचे नाव दादर हिंदू जिमखाना असे होते. पुढे माहीम पार्कचे नाव शिवाजी पार्क झाल्यानंतर या जिमखान्याचे नाव शिवाजी पार्क जिमखाना झाले. या भागातील अनेक थोर साहित्यिकांच्या आणि कलाकारांच्या वास्तव्यामुळे या भागातील लोकांमध्ये एक खिलाडू वृत्ती रुजली आहे.

## जुरेल-पडिक्कलची दमदार शतके

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलिया 'अ' संघाने पहिला डाव ६ बाद ५३२ धावांवर घोषित केला. भारत अ संघाने प्रत्युत्तरात ७ बाद ५३१ धावा करत सामन्यात समतोल राखला. जुरेलने १४० धावा तर पडिक्कलने १५० धावा करून शतक झळकावले. भारताच्या 'अ' संघाने चार दिवसीय कसोटी संघात ऑस्ट्रेलिया 'अ' संघाला सडेतोड उत्तर दिले आहे. ऑस्ट्रेलियाने पहिला डाव ६ बाद ५३२ धावांवर घोषित केला आणि त्या प्रत्युत्तरात भारत 'अ' संघाने १४१.१ षटकांत ७ बाद ५३१ धावा केल्या आहेत. या सामन्यात जुरेल व पडिक्कल यांनी शतक झळकावून वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी भारतीय संघातल्या जागेवर दावा ठोकला आहे.

**स्मृती मानधनाचे विक्रमी शतक वाया | ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या वन डेसह जिंकली मालिका**

## फलंदाजांचा चौकार-षटकारांचा पाऊस

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत आणि ऑस्ट्रेलिया याच्या शनिवीर (दि. २०) रोजी तिसरा एकदिवसीय सामना झाला. त्यात फलंदाजांनी चौकार-षटकारांचा पाऊस पाडला. प्रथम फलंदाजीला आलेल्या ऑस्ट्रेलियासाठी एलिसा हिलीने १८ चेंडूत ३० धावा चोपून आक्रमक सुरुवात केली. त्यानंतर जॉर्जिया व्हॉली (८१) व एलिसा पेरी (६८) यांनी अर्धशतकीय खेळी केली. बेथ मूनी मैदानावर उभी राहिली आणि तिने आक्रमक खेळ करताना ७५ चेंडूत १३८ धावा कुटल्या. त्यात २३ चौकार व १ षटकाराचा समावेश होता. ॲश्लेघ गार्डनरने ३९ धावांचे योगदान दिले. भारताच्या पुरुष क्रिकेटपटूंनाही नाही जमला असा पराक्रम स्मृतीने केला. ऑस्ट्रेलियाचा संघ ५ बाद ३७८ धावांवरून ४१२ धावांवर गडगडला. या विकेट पडल्या नसत्या, तर ऑस्ट्रेलियाने आणखी अधिकच्या धावा फलकावर चढवल्या असत्या. ४१२ धावा उभ्या केल्यानंतर भारतीय खेळाडू शरणागती पत्करतील असा समज ऑस्ट्रेलियन गोलंदाजांना झाला होता. प्रतिका रावल (१०) व हर्लिन देओल (११) या झटपट बाद झाल्या. स्मृती मानधना व हरमनप्रीत कौर यांनी तिसऱ्या विकेटसाठी ६९ चेंडूत १२१ धावांची भागीदारी करून भारताला विजयाच्या मार्गावर ठेवले होते. स्मृती ६३ चेंडूंवर १७ चौकार व ५ षटकारांसह १२५ धावांची खेळी करून माघारी परतली आणि त्यानंतर भारताच्या पटापट विकेट पडल्या. हरमनप्रीतही ३५ चेंडूत ८ चौकारांसह ५२ धावा करून बाद झाली. ऑस्ट्रेलियाच्या ४०० पार



धावांसमोर जिद्दीने उभी राहिली; १४ चौकार, ४ षटकारांची आतषबाजी. दीप्ती शर्मा चांगली फटकेबाजी करत होती, परंतु तिला साथ द्यायला कोण उभीच राहिली नाही. आठव्या विकेटसाठी तिला स्नेह राणाने साथ देताना अर्धशतकी भागीदारी पूर्ण केली. दीप्ती ५८ चेंडूत ५ चौकार व २ षटकारांसह ७२ धावांवर झेलबाद झाली आणि भारताच्या विजयाच्या आशाही संपल्या. या सामन्यात दोन्ही संघाच्या मिळून ७८१ धावा झाल्या होत्या.

**स्मृतीचा मोठा विक्रम**

एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारताकडून सलग दोन शतकं दोनवेळा करणारी स्मृती एकमेव खेळाडू झाली आहे. यापूर्वी तिने जून २०२४ मध्ये तिने असा पराक्रम केला होता. ऑस्ट्रेलियाविरुद्धची ही वन डे क्रिकेटमधील चौथी सेंच्युरी आहे. एका कॅलेंडर वर्षात दुसऱ्यांदा तिने चार शतकं झळकावली आहेत. भारताच्या पुरुष व महिला क्रिकेटपटूंमध्ये एकदिवसीय क्रिकेटमध्ये वेगवान शतकाचा विक्रम स्मृतीने नावावर केला. तिने ५० चेंडूत शतक पूर्ण करताना विराट कोहलीचा विक्रम मोडला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)